सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २९ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३०४ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या जाणार!



नवी दिल्ली : अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आज सर्वोच्च न्यायालयात निर्णय होण्याची शक्यता होती. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. मात्र, आजच्या सुनावणीत निवडणुकांबाबत कोणताही ठोस निर्णय झाला नाही. यासंदर्भातील पुढील सुनावणी २५ फेब्रुवारीला होणार आहे.

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुका आणि ओबीसी आरक्षणासंबंधित दाखल याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. ओबीसी आरक्षणाशी संबंधित प्रकरणांमुळे निवडणुकांबाबत कोणताही निर्णय घेता आला नाही. त्यामुळे जिल्हा परिषद, नगर पंचायती, महानगरपालिका या निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता आहे.

सरकारी वकील सिद्धार्थ शिंदे यांनी सुनावणी संपल्यानंतर माहिती दिली की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी रोजी होईल. जर त्या दिवशी निर्णय झाला, तर निवडणुका एप्रिल किंवा मे महिन्यात होऊ शकतात.

याचिकाकर्त्यांचे वकील देवदत्त पालोटकर यांनी सांगितले की, ओबीसी आरक्षणाचा विषय आता संपलेला आहे, आणि यासंदर्भात कुठल्याही पक्षात मतभेद नाहीत. न्यायालयाने २५ फेब्रुवारी ही तारीख दिली आहे, त्यानंतर निवडणुकांचा मार्ग मोकळा होईल.

आजच्या सुनावणीचे महत्त्व म्हणजे ओबीसी आरक्षणाच्या गुंत्यातील मुख्य मुद्दे सोडवले गेले आहेत. राज्य सरकारचे वकील तुषार मेहता यांनीही न्यायालयाला सांगितले की, आम्हाला लवकरात लवकर निवडणुका घ्यायच्या आहेत. यामुळे २५ फेब्रुवारीला निवडणुकांच्या आयोजनाबाबत निर्णय होण्याची अपेक्षा आहे.

## निर्मला सीतारामन सलग आठव्यांदा मांडणार अर्थसंकल्प!

नवी दिल्ली : अर्थ मंत्रालयाने ऑक्टोबर २०२४ मध्ये अर्थसंकल्प तयार करण्यास सुरुवात केली. दरम्यान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या १ फेब्रुवारी रोजी लोकसभेत सकाळी ११ वाजता आठवा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. यामध्ये नव्या आर्थिक वर्षासाठी (१ एप्रिल ते ३१ मार्च) केंद्र सरकारचा प्रस्तावित खर्च आणि महसुली उत्पन्नाचा लेखाजोखा मांडण्यात येणार आहे. मागील चार केंद्रीय अर्थसंकल्प आणि एका अंतरिम अर्थसंकल्पाप्रमाणेच यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्पही पेपरलेस स्वरूपात सादर करण्यात येणार आहे.

कुठे थेट पाहता येईल अर्थसंकल्प?

केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत, दूरदर्शन आणि संसद टीव्हीच्या अधिकृत वाहिन्यांवर प्रसारित केला जाईल.सरकारच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवरही अर्थसंकल्प प्रसारित केला जाईल.सीतारामन यांचं केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ चं भाषण झीरहररी.ळप वरही पाहता येणार आहे.

बजेट २०२५ च्या लाइव्ह अपडेट्स आणखी कुठे मिळतील?

अर्थसंकल्पाची कागदी प्रत डिजिटल स्वरूपात केंद्र सरकारच्या www. indiabudget.gov.in या अधिकृत वेब पोर्टलवर उपलब्ध असेल. राज्यघटनेनं विहित केल्याप्रमाणे वार्षिक वित्तीय विवरण (सामान्यतः अर्थसंकल्प म्हणून ओळखले जाते), अनुदानाची मागणी (डीजी), वित्त विधेयक इत्यादींसह सर्व केंद्रीय अर्थसंकल्पीय दस्तऐवज 'केंद्रीय अर्थसंकल्प मोबाइल ॲप'वर उपलब्ध असतील.अर्थसंकल्पाची कागदपत्रं हिंदी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध असतील.

## चीनच्या 'DeepSeek AI' मुळे जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात खळबळ
### अमेरिकेच्या स्टॉक मार्केटला मोठा धक्का

वॉशिंग्टन : चीनच्या DeepSeek AI स्टार्टअपने त्यांच्या नवीन AI मॉडेलच्या लाँचद्वारे जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात खळबळ उडवली आहे. या अत्याधुनिक मॉडेलने कमी खर्चात उच्च दर्जाचा परफॉर्मन्स देत अमेरिकेतील प्रमुख तंत्रज्ञान कंपन्यांना अडचणीत टाकले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्री-मार्केट ट्रेडिंगमध्ये NVIDIA कॉर्पोरेशनच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली असून, टेक उद्योगावर मोठा परिणाम झाला आहे.

DeepSeek-V3 नावाने ओळखले जाणारे हे AI मॉडेल OpenAI आणि चशींर सारख्या कंपन्यांसोबत थेट स्पर्धा करत आहे. या मॉडेलच्या लाँचनंतर NVIDIA कंपनीच्या शेअर्स १७ टक्क्यांनी घसरले असून, कंपनीच्या बाजारमूल्यात ५९० अब्ज डॉलरची मोठी घट झाली आहे. याचा परिणाम NASDAQ इंडेक्सवर (US stock market) देखील झाला असून, तो ०.५० टक्क्याने खाली घसरला आहे.

DeepSeek AI चे वैशिष्ट्य

हे नवीन मॉडेल कमी खर्चात आणि अत्यंत कार्यक्षम आहे. याचे ओपन-सोर्स स्वरूप डेव्हलपर्सना त्यात सुधारणा करण्याची संधी देते. NVIDIA सारख्या महागड्या चिप्स आणि ऊर्जा खपत करणाऱ्या मॉडेलसच्या तुलनेत DeepSeek ने मर्यादित संसाधनांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे AI तंत्रज्ञानाच्या स्पर्धेत हे मॉडेल महत्त्वाचे ठरत आहे.

चीनच्या AI तंत्रज्ञानाला चालना

अमेरिकेने चीनवर हायटेक सेमीकंडक्टर तंत्रज्ञानावर निर्बंध घातले असतानाही DeepSeek ने मर्यादित संसाधने वापरून आपली क्षमता सिद्ध केली आहे. त्यामुळे चीनच्या AI उद्योगाला मोठी चालना मिळेल, अशी तज्ञांची अपेक्षा आहे. यामुळे जागतिक बाजारपेठेत चीनची पकड आणखी मजबूत होऊ शकते.

अमेरिकेसमोर आव्हान

DeepSeek AI च्या कामगिरीमुळे अमेरिकेतील टेक कंपन्यांना आपल्या व्यापार धोरणांमध्ये बदल करावा लागेल. १०० अब्ज डॉलर्सच्या स्टारगेट प्रोजेक्टला DeepSeek मोठा अडथळा ठरू शकतो, अशी भीती वर्तवली जात आहे.

जागतिक प्रभाव

DeepSeek AI मॉडेलने जागतिक AI उद्योगाला नवी दिशा दिली आहे. ओपन-सोर्स मॉडेलमुळे जगभरातील डेव्हलपर्समध्ये त्याचा मोठा प्रभाव पडला आहे. भविष्यात AI क्षेत्रात मोठे बदल घडवण्यासाठी DeepSeek महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## नवविवाहित जोडप्यांना मिळणार विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन!



पंढरपूर : महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविक येतात. तसेच विवाह झाल्यानंतर नवविवाहित जोडपे देवदर्शनासाठी जात असतात. अशातच पंढरपुरातील विठुरायाचे दर्शनला जाणाऱ्या जोडप्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने नवविवाहित जोडप्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ज्यामुळे लग्नानंतर विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी येणाऱ्या नवविवाहित जोडप्यांना दर्शन घेण्यासाठी रांगेत उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या बैठकीमध्ये दिव्यांगांच्या बरोबरच नवविवाहित जोडप्यांना व्हीआयपी दर्शन देण्याचा महत्त्वपूर्ण असा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी नवविवाहित जोडप्यांना विठुरायाच्या दर्शनासाठी मोठ्या रांगेत उभे राहावे लागत होते. मात्र आता या निर्णयामुळे पंढरपूरमध्ये दर्शनासाठी येणाऱ्या नवविवाहित जोडप्याला विठुरायाचे लागलीच व चांगले दर्शन घेता येणार आहे.

स्थानिक नागरिकांसाठीही वेळ निश्चित

त्याचबरोबर पंढरपुरातील स्थानिक नागरिकांना देखील सकाळी सहा ते सात आणि रात्री दहा ते साडेदहा वाजेपर्यंत दर्शनाला सोडले जाणार आहे. अर्थात यामुळे दर्शनासाठी होणारी गर्दी कमी होऊ शकेल. याची अंमलबजावणी गुरुवारपासून म्हणजे २९ जानेवारीपासून करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

## श्रीलंकेच्या गोळीबारात २ भारतीय मासेमार जखमी

नवी दिल्ली : डेल्फ्ट बेटाजवळ श्रीलंकेच्या नौदलाने केलेल्या गोळीबारात २ भारतीय मासेमार गंभीर जखमी झाले आहेत. भारतीय मासेमारांच्या मुद्द्यावर भारताने श्रीलंकेकडे नाराजी व्यक्त केली आहे. श्रीलंकेच्या कार्यवाहक राजदूताला परराष्ट्र मंत्रालयात बोलावण्यात आले आहे आणि तीव्र निषेध नोंदवण्यात आला आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात देण्यात आली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलल्या निवेदनात सांगितले की, 'आज सकाळी डेल्फ्ट बेटाजवळ १३ भारतीय मच्छिमारांना ताब्यात घेत असताना श्रीलंकेच्या नौदलाने गोळीबार केला. मासेमारी बोटीवरील १३ मच्छिमारांपैकी दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जाफना रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जाफना येथील भारतीय वाणिज्य दूतावासाच्या अधिकाऱ्यांनी रुग्णालयात जखमी मच्छिमारांची भेट घेतली. नवी दिल्लीतील श्रीलंकेच्या कार्यवाहक उच्चायुक्तांना आज,मंगळवारी सकाळी परराष्ट्र मंत्रालयात बोलावण्यात आले. भारताने या घटनेचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला. कोलंबोमधील भारतीय उच्चायुक्तालयानेही श्रीलंका सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयासमोर हा विषय उपस्थित केला आहे. भारत सरकारने नेहमीच मच्छिमारांशी संबंधित समस्या मानवीय आणि मानवतावादी पद्धतीने सोडवण्याच्या गरजेवर भर दिला आहे. यामध्ये उपजीविकेशी संबंधित बाबींचाही विचार करण्यात आला आहे. कोणत्याही परिस्थितीत बळाचा वापर स्वीकारार्ह नाही. या संदर्भात दोन्ही सरकारांमधील विद्यमान सहमतीचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे, असेही परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. श्रीलंकेच्या नौदलाने पुदुचेरीच्या केंद्रशासित प्रदेशातील कराइकल येथून १३ मच्छिमारांना समुद्र सीमा उल्लंघन प्रकरणी अटक केली आहे.



पुदुचेरी सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, सरकार मच्छिमार आणि त्यांच्या यांत्रिक बोटी सोडण्यासाठी केंद्र सरकारचा हस्तक्षेप मागेल. मच्छिमारांच्या सुटकेसाठी सरकार परराष्ट्रमंत्र्यांच्या संपर्कात असल्याचा दावा पुदुचेरीचे मत्स्यव्यवसाय मंत्री के. लक्ष्मीनारायणन यांनी केला आहे. श्रीलंकेचे नौदल राज्यातील भारतीय मच्छिमारांना अटक करते तेव्हा राज्य सरकार केंद्राला पत्र लिहिण्यापुरते मर्यादित असते, अशा शब्दांमध्ये ऑल इंडिया द्रविड मुन्नेत्र कडगमचे (एआयएडीएमके) प्रमुख आणि तामिळनाडूचे विरोधी पक्षनेते पलानीस्वामी यांनी द्रमुक सरकारवर टीका केली आहे.

## महाकुंभाला जाणाऱ्या रेल्वेवर जमावाचा हल्ला!
### मध्यप्रदेशाच्या हरपालपूर रेल्वे स्थानकावरील घटना

छत्तरपूर : महाकुंभा दरम्यारन एक धक्कापदायक घटना समोर आली आहे. प्रयागराजला निघालेल्या रेल्वेलवर जमावाने हल्लान केल्याचे समोर आले आहे. ही घटना मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील हरलापूर स्टेशनवर घडली. अचानक झालेल्या तोडफोडीमुळे रेल्वेतील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओही समोर आला आहे.

यासंदर्भातील माहितीनुसार झाशी मंडलच्या हरपालपूर स्थानक परिसरात या रेल्वेवर इतक्याह भयावह प्रकारे हल्ला करण्यात आला की, रेल्वेच्या बोगीमध्ये बसलेल्यो प्रवाशांमध्ये कल्लोपळ माजला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला असून, त्याो व्हिडिओमध्ये लोकांचा मोठा समुह अचानक गर्दीत सामील झाला अन् रेल्वेच्या बोगीवर दगडफेक करू लागला. लोकांची ही गर्दी रेल्वेत घुसण्याचा प्रयत्न करत होती. पण जेंव्हा लोकांना रेल्वेत आत जाता येईना तेंव्हा लोकांनी रेल्वेच्या बोगीच्या दरवाजे आणि खिडक्यांचा काचा फोडल्यात. प्रयागराजमध्ये उद्या, बुधवारी मौनी अमावस्येच्या पार्श्वभूमीवर प्रचंड गर्दी होण्याची शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे. लाखोंच्या संख्येने भाविक प्रयागराजमध्ये स्नानासाठी पोहचण्याची शक्यता आहे. रेल्वेंवर अशा प्रकारे झालेल्यो हल्ल्यामुळे रेल्वे सुरक्षेच्या मुद्यावरून टीका केली जात आहे. महाकुंभाच्या पार्श्वभूमीवर उत्तलर प्रदेशच्या सरकारने कडेकोट बंदोबस्ते ठेवला आहे. कुंभ नगरी प्रयागराजमध्ये ठिक-ठिकाणी पोलिस तैनात करण्यात आले आहेत. सोबतच प्रशासकीय अधिकारीही परिस्थितीवर नजर ठेवून आहेत.

## अटल सेतूवर सध्याच्याच सवलतीच्या दराने आणखी एक वर्षभर पथकर आकारणी

मुंबई : अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवर सध्या सुरू असलेल्या सवलतीच्या दरानेच आणखी एक वर्षभर पथकर आकारणी करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या वापराकरिता यापुर्वी ४ जानेवारी २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत एमएमआरडीएने प्रस्तावित केलेल्या दराच्या ५० टक्के सवलतीच्या दराने पथकर (कमीत कमी २५० रुपये इतका) आकारणीचा निर्णय घेण्यात आला होता. या दराचा एक वर्षानंतर आढावा घेण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. त्यानुसार आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आणखी एक वर्षभर म्हणजेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सध्या सुरु असलेल्या सवलतीच्या दरानेच पथकर आकारणीस मान्यता देण्यात आली.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणातर्फे उभारण्यात आलेला हा सुमारे २२ किलोमीटर लांबीचा अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू प्रकल्प १३ जानेवारी २०२४ पासून सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

## वसईत क्रिकेट खेळताना एका २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू

वसई : वसईच्या कोपर गावात क्रिकेट खेळताना एका २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गावातील मैदानावर क्रिकेट खेळताना हृदयविकाराचा झटका आल्याने तरुणाचा मृत्यू झाला आहे. तरुणाला तातडीने रुग्णालयात भरती करण्यात आलं. पण तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सागर वझे असे या मृत क्रिकेटपटूचे नावं आहे. तो अवघा २७ वर्षांचा होता. चांगला खेळाडू अशी सागर वझेची पंचक्रोशीत ओळख होती. शुक्रवारी संध्याकाळी गावच्या पोरांच्यात सामना सुरू झाला. सचिन सामना खेळण्यासाठी मैदानात पोहोचला.सचिनने सामन्यात दोन बॉलवर दोन सिक्स मारले. त्यानंतर तिसरा सिक्स मारण्याची मागणी प्रेक्षकांकडून होऊ लागली. पण तिसरा सिक्स मारण्यासाठी पुढे आला आणि त्याचवेळी त्याला हृदयविकाराचा तीव्र झटका आला.

## ३२०२ रोहिंग्यांना परभणीतून जन्म प्रमाणपत्र..!; किरीट सोमय्या यांनी महसूल प्रशासनास धरले धारेवर

परभणी,दि.२८(प्रतिनिधी) : परभणी सारख्या तालुक्यातून ३ हजार २०२ बांगलादेशीय रोहिंग्यांना प्रशासनाद्वारे जन्म प्रमाणपत्र वितरीत झाले असून ही बाब अत्यंत गंभीर आहे, असे मत भारतीय जनता पार्टीचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी परभणीत एका बैठकीतून व्यक्त केले. या जन्म प्रमाणपत्र घोटाळ्यातील संबंधितांविरुध्द कठोर कारवाई तर होईलच परंतु, या देशविरोधी षडयंत्राची अधिकार्यांनी गांभीर्याने दखल घेतली पाहिजे, भविष्यात या पध्दतीची बनावट प्रमाणपत्रे वितरित होणार नाहीत, याची खबरदारी घेतली पाहिजे, असा इशारा दिला.

भाजपाचे नेते सोमय्या हे मंगळवार २८ जानेवारी रोजी दुपारी सुरक्षा रक्षकांच्या ताफ्यानिशी जालन्याहून वाहनांद्वारे परभणीत दाखल झाले. लगेचच जिल्हाधिकारी कार्यालय गाठून सोमय्या यांनी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे,



उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, तहसीलदार डॉ. राजापूरे यांच्यासह अन्य अधिकार्यांबरोबर संयुक्तपणे हितगुज केले. यातून सोमय्या यांनी परभणी सारख्या छोट्या विभागातूनच ७० वर्षांपूर्वी जन्मलेल्या व्यक्तींना प्रशासनाने गेल्या सहा महिन्यात हजारोनिशी जन्म प्रमाणपत्र वितरित केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. जन्म प्रमाणपत्र प्राप्त करणारे बहुतांशी रोहिंगे आहेत, बांगलादेशीय आहेत, असे नमूद करीत सोमय्या यांनी काहींनी केवळ आधार कार्डच्या आधारावर जन्म प्रमाणपत्र प्राप्त केले आहेत. तर काहींनी स्वस्त धान्य दुकानातील अस्पष्ट असणार्या रेशन कार्डच्या प्रती देवून जन्म प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. हे प्रकार अत्यंत गंभीर असून थातूर मातूर पुराव्याच्या आधारे जन्म प्रमाणपत्र वितरित करणे म्हणजे एक प्रकारे देशद्रोहच आहे, असे सूनावले.

यात गुंतलेल्या संबंधितांविरुध्द निश्चितच कारवाई होईल, असे स्पष्ट करतेवेळी काहींनी एखाद दोन प्रमाणपत्राच्या आधारे परस्परच बनावट जन्म प्रमाणपत्र छापल्याचेही प्रकार निदर्शनास आले असल्याची माहिती दिली. तालुका असो, महसूल प्रशासनाकडून चूका निश्चित झाल्या आहेत. काहींनी मोहापोटी या चूका केल्या असतील परंतु, भविष्यात या पध्दतीच्या चूका घडू नयेत, असा इशारा देवून सोमय्या यांनी संपूर्ण राज्यात बांगलादेशीय रोहिंगे हे पध्दतशीरपणे मुंबई, पुणे, नाशिक या महानगरांऐवजी मराठवाडा व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जावून पैशाचे आमिष दाखवून, थातूर मातूर कागदपत्रे सादर करीत जन्म प्रमाणपत्र मिळवू लागले आहेत, यात एक मोठी गँगच कार्यरत असून त्यांचे हे षडयंत्र प्रशासनाने ओळखावे हा एक मोठा दहशतवादा सारखाच प्रकार आहे, हे लक्षात घ्यावे, हे देशविरोधी कृत्य, गद्दारी निपटून काढावी, असे आवाहन करीत सोमय्या यांनी संपूर्ण राज्यात ठिकठिकाणी जन्म प्रमाणपत्र घोटाळ्यातून रोहिंग्यांनी प्राप्त केलेल्या जन्म प्रमाणपत्रांची संख्या सांगितली. थातूर मातूर शपथपत्रे सादर करीत जन्म प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या या रोहिग्यांविरोधात प्रशासनाने तात्काळ खटले दाखल करावेत, पोलिस प्रशासनानेही फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी सूचनाही सोमय्या यांनी केली.

दरम्यान, सोमय्या यांच्या समवेत भारतीय जनता पार्टीच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, महानगर जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, माजी नगरसेविका सौ. मंगल मुदगलकर, भाजपाचे नेते बाळासाहेब जाधव, संजय रिझवानी यांच्यासह अन्य नेतेमंडळी व पदाधिकारी उपस्थित होते.

विको®
— विश्वसनीय आयुर्वेद —
१९५२ पासून
संपूर्ण स्वदेशी | Go natural आयुर्वेदिक औषधी
लग्नाच्या हळदीसाठी
विको टर्मरिक शादी पॅक
आता लग्नातील हळद समारंभासाठी हळदीचा लेप बनविण्याची आवश्यकता नाही. विको सादर करीत आहे स्पेशल विको शादी पॅक,जो उपलब्ध आहे दोन प्रकारात... विको टर्मरिक आणि विको टर्मरिक WSO. तर आणा, लावा आणि वेडिंग ग्लोसाठी तयार व्हा!




- हळद लावणे एकदम सोपे कुठल्याही त्रासाशिवाय
- हळदीसारखे डाग पडत नाहीत
- आल्हाददायक सुगंध
- तजेलदार त्वचा

Also available on amazon.in
• Follow us on @viccolabs • Like us on /ViccoLabs
• Shop online at https://viccolabs.com • Customer Care No. 0712-2420890
अधिक माहितीसाठी आणि खरेदी करण्यासाठी इथे स्कॅन करा.

## पायरसीच्या विरोधात नवनीत एज्युकेशन लिमिटेडचा सक्रिय पुढाकार

अहिल्यानगर: नवनीत एज्युकेशन लिमिटेड (एनईएल) ने पायरसीचा मुकाबला करण्यासाठी आणि साहित्य चोरीचा धोका टाळण्यासाठी आपली सक्रिय मोहीम सुरू ठेवली आहे, शैक्षणिक क्षेत्रातील नैतिकतेला चालना देण्याच्या नवनीतची समर्पण भावना यातून प्रतिबिंबित होते. या वर्षाच्या सुरुवातीच्या यशस्वी प्रयत्नानंतर, एनईएल शैक्षणिक पायरसीच्या विरुद्धचा लढा चालू ठेवत आहे.सदर उपक्रमाद्वारे, फोटोकॉपी विक्रेते आणि व्यापक समाजामध्ये कॉपीराइट उल्लंघनाच्या कायदेशीर आणि नैतिक परिणामांबद्दल जागरूकता वाढवणे, हे एनईएल चे उद्दिष्ट आहे. अनेक व्यक्तींना पायरसीच्या कायदेशीर आणि सामाजिक परिणामांबद्दल पुरेशी माहिती नसावी, हे ओळखून नवनीतने या समस्येचे थेट निराकरण करण्यासाठी सक्रिय पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, जानेवारी २०२५ मध्ये, महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये - अहिल्यानगर (अहमदनगर) आणि जवळपासच्या शहरांमध्ये विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले, ज्यात कायदा अंमलबजावणी संस्था, नवनीतचे स्थानिक प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, आणि दूरदर्शीपणे नियुक्त निरीक्षकांचा समावेश होता. साहित्य निर्मात्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि शैक्षणिक साहित्यासाठी योग्य जागा सुनिश्चित करण्यासाठी पायरसीविरुद्ध एनईएल चा लढा प्रकाशन संस्थेची बांधिलकी अधोरेखित करतो. या लढ्यामुळे समाजामध्ये पायरसीमुळे होणाऱ्या हानीबद्दल जागरुकता येईल आणि कॉपीराइट कायद्यांचा आदर तसेच समर्थन करण्यासाठी अधिक लोक प्रेरित होतील, अशी नवनीतला आशा आहे.

## वैज्ञानिक विश्लेषण चाचणीत टाटा सॉल्ट ठरले सर्वोत्तम शुद्ध

महाराष्ट्र : भारताच्या आयोडीनयुक्त मीठ क्षेत्रातील आणि बाजारपेठेतील अग्रणी टाटा सॉल्टने १९८३ पासून आपल्या उत्पादनांमध्ये अतुलनीय शुद्धता आणि परिष्करणाची परंपरा कायम ठेवली आहे. प्रयोगशाळेतील चाचणीद्वारे सिद्ध झाले आहे की टाटा सॉल्ट हे देशभरातील १०० मीठांपैकी सर्वाधिक शुद्ध आहे. या उपक्रमामुळे टाटा सॉल्ट केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात शुद्धतेचा आणि प्रामाणिक अस्सलतेचा मापदंड ठरले आहे. टाटा सॉल्ट हे उत्कृष्टतेच्या बांधिलकीने प्रेरित, मीठ उद्योगातील सर्वोच्चतेचे प्रतीक आहे. या उपक्रमाद्वारे देशभरातील विविध प्रकारच्या मीठांशी कठोरपणे तुलना करून टाटा सॉल्टने आत्मविश्वासपूर्वक आपल्या सर्वोत्तमपणाचा दावा केला आहे. दर्जाच्या प्रति अपार निष्ठा आणि नवीन मानक स्थापित करण्याच्या दृढ निर्धारामुळे, टाटा सॉल्ट हा अतुलनीय शुद्धतेत आणि उत्कृष्ट दर्जाच्या शोधात असलेल्या ग्राहकांसाठी अंतिम पर्याय ठरतो.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेचा नफा वाढला

मुंबई : आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे अलेखापरिक्षित आर्थिक निकाल जाहीर केले. सर्व उद्योगांमध्ये सूक्ष्म वित्त व्यवसायाच्या वाढत्या गुन्हेगारीचा विचार करता, बँक सूक्ष्म वित्त व्यवसायाचे बारकाईने निरीक्षण करत आहे. एकूण कर्जबुकच्या सुमारे ९५टक्के असलेल्या एकूण एनपीए, निव्वळ एनपीए, एसएमए आणि नॉन-मायक्रो वित्त व्यवसायाच्या तरतुदींसह मालमत्ता गुणवत्ता निर्देशक स्थिर आहेत. आयडीएफसी फर्स्ट बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, आमची बँक कर्ज आणि ठेवींमध्ये चांगली वाढ करत आहे. आमच्या ग्राहकांच्या ठेवी २९टक्के वार्षिक दराने वाढून २,२७,३१६ कोटी रुपयांवर पोहोचत आहेत, तर सीएएसए गुणोत्तर ४८टक्के वर टिकून आहे. कर्जे आणि ॲडव्हान्स २२टक्के वार्षिक दराने वाढून २,३१,०७४ कोटी रुपयांवर पोहोचले आहेत.

## 'दवनअँडओन्ली' एक आइकोनिक आणि इन-वॉग जगात प्रवेश करण्याचा एकमेव मार्ग

मुंबई :ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर त्याच्या सर्वात प्रसिद्ध आवृत्तीचे उद्घाटन करतो, जिथे फॅशन फक्त प्रारंभआहे आणि'द वन अँड ओन्ली' अशी एक अनोखी दुनिया तयार केली जाते. २०२५ च्या टूरमध्ये अत्याधुनिक रूप उलगडले जाईल जे अत्याधुनिकतेत प्रवेश करेल, आणि जागतिक फॅशन, संगीत आणि मनोरंजनयांचे शानदार प्रदर्शन करून शुद्ध आश्चर्य उत्पन्न करेल. फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया (एफडीसीआय) सोबत एकदा पुन्हा यशस्वीपणे भागीदारी करत, फॅशनटूर त्याच्या ग्लॅमरस आणि विलासीतेचा उत्सव साजरा करेल. यामध्ये भारतातील काही अत्यंत मागणी असलेले फॅशन क्षेत्रातील आवाज आणि भारतातील सर्वात आकर्षक स्टाइल आयकॉन्स सहभागी होणार आहेत, जे निःसंशयपणे देशभरच चेंचा विषय ठरतील..

## वसुंधराचा भारतीय तटरक्षक दल ते अमेझॉन पर्यंतचा प्रवास

मुंबई - ज्या लोकांनी आपले जीवन देशसेवेसाठी समर्पित केले आहे, त्यांच्यासाठी कॉर्पोरेट जगात जाणे हे केवळ करिअर बदलापेक्षा जास्त आहे - ते परिवर्तनाचा प्रवास आहे. लष्करी माजी सैनिकांमध्ये धोरणात्मक दृष्टी, दृढ शिस्त आणि अतुलनीय लवचिकता यांचे दुर्मिळ मिश्रण असते. ॲमेझॉनच्या लष्करी कार्यक्रमाद्वारे, माजी सैनिकांना नवीन भूमिकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्याचे अधिकार दिले जातात, जे त्यींना दुसरे करिअर प्रदान करण्यासाठी समर्पित आहे. वसुंधरा नोनारे ही अशाच एक अनुभवी महिला आहे, ज्यांचा प्रवास - भारतीय तटरक्षक दल ते अमेझॉन - हा देशाची सेवा केल्यानंतर अनुभवी महिला कशी एक परिपूर्ण आणि यशस्वी कारकीर्द घडवत आहेत याचे एक शक्तिशाली उदाहरण आहे.वसुंधरा यांनी एक दशक भारतीय तटरक्षक दलात सेवा बजावली आणि राष्ट्रीय सुरक्षेत उल्लेखनीय योगदान दिले. भारताच्या पहिल्या महिला हॉवरक्राफ्ट वैमानिकांपैकी एक म्हणून, त्यांची कारकीर्द साहसी आणि उच्च-स्तरीय आव्हानांनी भरलेली आहे. त्यांच्या अनुकरणीय सेवेमुळे त्यांना प्रतिष्ठित महासंचालक भारतीय तटरक्षक दलाचे कौतुक मिळाले. या अनुभवांमुळे दबावाखाली जुळवून घेण्याची, संकटांमध्ये लवचिक राहण्याची आणि सहानुभूतीने नेतृत्व करण्याची त्यांची क्षमता निर्माण झाली - ही कौशल्ये आता अमेझॉनमध्ये त्यांच्या नेतृत्वाचा आधारस्तंभ बनतात. संकटांना प्रत्यक्ष पाहिल्याने हे बळकटी मिळाली की खरे नेतृत्व म्हणजे निर्णायकता आणि सहानुभूतीचा नाजूक संतुलन, वसुंधरा म्हणाल्या. हे एक तत्व आहे जे मी अमेझॉनमधील माझ्या टीमसोबत दररोज पाळते. त्यांच्या कार्यकाळात, त्यांनी श्रीलंकेतील कठोर समुद्र सहन करून चेन्नई ते गोवा असा संपूर्ण महिला क्रूसह नौकानयन प्रवास देखील केला. या अनुभवांनी त्यांच्यात निर्णायकता, टीमवर्क आणि सहानुभूतीवर आधारित एक अद्वितीय नेतृत्व तत्वज्ञान निर्माण केले.

## फर्दापूर येथे महावितरण कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आला



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २८ फर्दापूर येथे महावितरण कार्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कनिष्ठ अभियंता शेख साहेब, वरिष्ठ यंत्र चालक किरणकुमार डुकरे, अरुण पाटील,आसिफ पठाण, जितेंद्र बनसोडे, इम्रान सय्यद, विजय चौधरी, सुनिल साळवे, स्वप्निल लव्हाळे, समाधान सपकाळ, भगतसिंग परदेशी, सिताराम नवगिरे, गणेश मोरे, रविंद्र झारगड, नवनाथ,मोईन, धनराज मोकासरे,हफीस पठाण, अशोक होंबे, सागर बोराडे यांनी सकाळी सात महावितरण कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आला.

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा मैदानाची पाहणी

# महाराष्ट्र केसरी स्पर्धा जिल्ह्याच्या क्रीडा विकासाचे पहिले पाऊल : पालकमंत्री



अहिल्यानगर दि.२५- राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाडिया पार्क येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या मैदानाची पाहणी केली. जिल्ह्यात नव्याने सुरू झालेल्या क्रीडा विकासाच्या पर्वाचे महाराष्ट्र केसरी स्पर्धा पहिले पाऊल आहे, असे श्री.विखे पाटील यावेळी म्हणाले.

त्यांच्या समवेत आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आदी होते. पालकमंत्र्यांनी स्पर्धा आयोजनाची माहिती घेतली. स्पर्धेच्या वेळी कुस्तीच्या आखाड्याभोवती प्रेक्षकांची गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. स्पर्धेसाठी येणारे मल्ल, पंच आणि पदाधिकाऱ्यांची चांगली व्यवस्था करावी. कुस्तीगीरांना कोणतीही अडचण येणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे. स्पर्धा स्मरणीय होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले. तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाडिया पार्क येथील क्रीडा सुविधांसाठी ५० कोटी रुपये मंजूर केले आहे. यातील २० कोटीचा निधी पहिल्या टप्प्यात प्राप्त होत आहे. यातून दर्जेदार सुविधा निर्माण कराव्या. आवश्यकता असल्यास अधिक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. आमदार जगताप यांनी कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाची माहिती दिली. ८०० पेक्षा अधिक कुस्तीगीर, १५० पंच आणि २०० पेक्षा अधिक पदाधिकारी स्पर्धे साठी येणार आहेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे संतोष भुजबळ, शिवाजी चव्हाण, अर्जुन शेळके, युवराज करुजले उपस्थित होते.

## नाबार्डचा १५ हजार २१६ कोटी रुपयांचा पतआराखडा; जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विमोचन

छत्रपती संभाजीनगर, दि.२८(जिमाका)-जिल्ह्याचा सन २०२५-२६ साठी १५ हजार २१६ कोटी रुपयांचा पतआराखडा नाबार्ड मार्फत तयार करण्यात आला असून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज या आराखड्याचे विमोचन केले. जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगेश केदार आणि नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक सुरेश पटवेकर हे यावेळी उपस्थित होते.

या संदर्भत नाबार्डचे व्यवस्थापक सुरेश पटवेकर यांनी माहिती दिली की, कृषी पत, कृषी पायाभूत सुविधा आणि पूरक क्षेत्रविकास अशा तीन क्षेत्रांचे वर्गीकरण करुन पतआराखड्यात तरतूद करण्यात आली आहे. त्यात कृषी पत यात ४ हजार २६७ कोटी रुपये, त्यात प्राधान्याने शेतमाल उत्पादन, देखभाल व विपणन, कृषी कर्ज व संलग्न उपक्रमांचा समावेश आहे. कृषी पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी २३९ कोटी रुपयांची तरतूद असून इतर पूरक क्षेत्रविकास क्षेत्रासाठी सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांस्ठी ८०१० कोटी रुपये, निर्यात कर्ज पुरवठ्यासाठी ३६ कोटी रुपये, शिक्षणासाठी ९९ कोटी रुपये, सामाजिक पायाभूत सुविधा ७८ कोटी रुपये, उर्जा नविनीकरणासाठी ६० कोटी रुपये, इतर ४३३ कोटी रुपये असा एकूण १५ हजार २१६ कोटी रुपयांचा पत आराखडा तयार करण्यात आला आहे. गत वर्षी पत आराखडा १२ हजार ७६५ कोटी रुपयांचा होता, अशी माहिती सुरेश पटवेकर यांनी दिली.

### अध्यक्ष राजा माने यांची घोषणा,सावंतवाडी येथील भोसले नॉलेज सिटीच्या प्रांगणात होणार भव्य महाधिवेशन

# डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना सावंतवाडी महाअधिवेश नितेश राणे यांनी स्वागताध्यक्ष तर डॉ. अच्युत भोसले यांनी सह स्वागत अध्यक्षपद स्वीकारले

### सावंतवाडी येथे ६ एप्रिल रोजी होणार महा अधिवेशन; राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना अधिवेशनासाठी निमंत्रण




सावंतवाडी /प्रतिनिधी

देशातील पहिल्या डिजिटल मीडिया संपादक पत्रकारांची संघटना असलेल्या डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे तिसरे महा अधिवेशन सावंतवाडी (सिंधुदुर्ग) येथे भोसले नॉलेज सिटी च्या प्रांगणात ६ एप्रिल रोजी होणार असून राज्यातील विविध मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना या अधिवेशनासाठी निमंत्रित केले आहे. या अधिवेशनासाठी महाराष्ट्रातून ३ हजार हून अधिक संपादक पत्रकार उपस्थित राहणार असून या महा अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे तर सहस्वागत अध्यक्षपदी डॉ. अच्युत भोसले हे राहणार आहेत, या ऐतिहासिक तिसऱ्या महा अधिवेशनाच्या संयोजक पदाची जबाबदारी संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष सागर चव्हाण व सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भरत केसरकर यांच्यावर सोपवली असल्याची माहिती राजा माने यांनी सावंतवाडी येथे पत्रकार परिषदेत दिली.

या महाअधिवेशनासाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, उद्योग भरत मंत्री उदय सामंत, रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले ,आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री खासदार नारायण राणे,माजी मंत्री व सिंधुदुर्ग चे आमदार दीपक केसरकर यांना विशेष निमंत्रित करण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष राजा. माने साहेब, राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत ,कोकण विभाग अध्यक्ष सागर चव्हाण , पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले, राज्य कार्यकारणी सदस्य कुंदन हुलावळे, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भरत केसरकर यांची उपस्थिती होती.

संघटनेचे यापूर्वी भिलार महाबळेश्वर व कनेरी मठ कोल्हापूर येथे महाअधिवेशन झाले होते सावंतवाडी येथे होणाऱ्या तिसऱ्या महाअधिवेशनाच्या निमित्ताने राज्यभरातील आठ विभागातील ज्येष्ठ पत्रकार संपादकांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. यासह मान्यवर व्यक्तींची प्रकट मुलाखत, डिजिटल मीडिया मधील मान्यवर व अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन, परिसंवाद असे विविध कार्यक्रम होणार आहेत. राज्यभरातील डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या सभासदांनी या अधिवेशनासाठी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करावी असे आवाहन यावेळी अध्यक्ष राजा माने यांनी केले आहे.

## डॉ. प्रशांत यवतकर यांच्या मन:स्पर्श कविता संग्रहाचे प्रकाशन



नगर : येथील श्री व्यंकटेश आरोग्यधामचे संचालक व प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. प्रशांत यवतकर यांच्या 'मन:स्पर्श' कविता संग्रहाचे प्रकाशन आ. महेश शिंदे यांच्या हस्ते नुकतेच झाले. खटाव ( जि सातारा ) ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या कार्यक्रमाचे वेळी सातारा जिल्हा बॅंकेचे संचालक प्रदीप विधाते, डॉ. प्रिया शिंदे , लेखक दिग्दर्शक नितीन पवार, सुहास जोशी, प्रकाशक स्वप्निल करळे, यवतकर गुरुजी, नंदकुमार यवतकर, डॉ.वर्षा तांदूळवाडकर, डॉ.श्री व सौ.रेवले, शरद पंडीत व मोठ्या संख्येत मित्र परिवार तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. यवतकर यांच्या सर्व कविता भावविभोर असून त्यांच्या संवेदनशील मनाचे प्रतिबिंब सर्व कवितेतून जाणवते. वाचकही त्यांच्या कवितांशी नक्कीच तादात्म्य पावेल अशी आशा कविता संग्रहाच्या प्रास्ताविकामध्ये ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र माने यांनी व्यक्त केली आहे. माझ्या मनाप्रमाणे जीवन जगण्याचे स्वातंत्र्य देणाऱ्या आई-वडिलांना हा कवितासंग्रह समर्पित करीत असल्याचे डॉ. यवतकर यावेळी म्हणाले. आयुर्वेदाचार्य डॉ. प्रशांत यवतकर यांच्या मन:स्पर्श या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना आ. महेशदादा शिंदे, प्रियाताई शिंदे, सातारा जिल्हा बॅंकेचे संचालक प्रदीप अण्णा विधाते, सुहास जोशी, प्रसिद्ध लेखक व दिग्दर्शक नितीन पवार, जयदीप दादा शिंदे आदी उपस्थित होते.

## महाडीबीटीद्वारे मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती; ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.२८(जिमाका)- अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्याम्साठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना महाडीबीटी या पोर्टलद्वारे राबविली जाते. त्यासाठी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापकांनी ऑनलाईन भरुन घ्यावे व योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन जिल्हा समाजकल्याण अधिकारी एस.डी. चव्हाण यांनी केले आहे. योजनेचा तपशिलः- इयत्ता ९ वी, १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांचाही समावेश, इयत्ता ५ वी ते ७ वी आणि ८ वी ते १० वी मधील अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती. महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपद्धतीः- अर्ज भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रे मुख्याध्यापकांकडे सादर करावे, संबंधित मुख्याध्यापकांनी आपल्याकडील अर्ज ऑनलाईन संबंधित गटशिक्षणाधिकारी यांच्या लॉगईनवर सादर करावे. संबंधित गटशिक्षण अधिकारी यांनी अर्जांची तपासणी करुन पात्र व परिपूर्ण अर्ज जिल्हास्तरावरील समाजकल्याणच्या लॉगईनवर सादर करावे. शहरातील, महनगरपालिका क्षेत्रातील , अनुदानित, ग्रामिण भागातील जिल्हा परिषद, अनुदानित खाजगी शाळांनी सन २०४- २५ मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरावे. कोणीही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची संबधित मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी , प्रशासन अधिकारी यांनी दक्षता घ्यावी,असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी एस.डी. चव्हाण यांनी केले आहे.

## युवासेना तालुका प्रमुख कुणाल राजपुत यांच्या वतीने शेतकऱ्यांना आधार प्रमाणिकरण करण्याचे आवाहन

तभा.वृत्तसेवा



सोयगाव, दि.२८ जानेवारी : सोयगांव तालुक्यातील माहे जुलै ते सप्टेंबर महीन्यात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून नुकसान भरपाई मदत जाहीर करण्यात आली आहे,त्याकरीता दि.२७ जानेवारी सोमवार पासुन आधार प्रमाणिकरण करणे सुरू झाले आहे.त्यासाठी शेतकऱ्यांनी जवळील महाईसेवा केंद्र किवा आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन ए-घधउ करून घ्यावी असे आवाहन युवासेना तालुका प्रमुख कुणाल राजपुत यांच्या वतीने करण्यात आले.व यासाठी राज्य सरकार कडे पाठपुरावा केला त्याबद्दल सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांचे आभार मानले.

## प्रजासत्ताक दिनी होमगार्ड कार्यालय येथे माजी होमगार्ड किसनराव नरोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२८: प्रजासत्ताक दिनाचे निमित्ताने होमगार्ड पथक कार्यालय लासूर नाका तालुका गंगापूर येथे सकाळी आठ वाजता प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी होमगार्ड पथकातील जे सैनिक सेवा समाप्त झालेले आहेत यांना सन्मानाने एक दिवस बोलावण्यात येते व त्यांच्या हस्ते त्यांचा सन्मान म्हणून त्यांच्या हस्ते ध्वजारोहण केल्या जाते यावेळी हा बहुमान गंगापूर पथकातील माजी पलटण नायक श्री किसनराव दादाराव पाटील नरोडे यांना देण्यात आला वयाच्या ८१ वर्ष पूर्ण असलेले नरोडे यांनी यावेळी ध्वजारोहण करून सर्व होमगार्डना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व त्यांना हा सन्मान दिल्याबद्दल पथकाचे आभार व्यक्त केले.

यावेळी पथकाच्या वतीने समादेशक अधिकारी श्री चंद्रशेखर पाटील यांनी श्री नरोडे यांचे शाल श्रीफळ व पुष्प गुच्छ देऊन सन्मान केला.

याप्रसंगी तालुक्यातील माजी लिपिक अशोक लगड,माजी सैनिक कॅप्टन मंडलिक , नेवासा येथील काळे तसेच पिटीसी मनोज आहेर यांच्या समवेत सर्व होमगार्ड व महिला होमगार्ड यांनी हजर राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## सोयगांव येथील कवी माणिक सोनवणे यांना दिल्लीचे आमंत्रण

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ जानेवारी : येथील कवी माणिक सोनवणे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाला त्यांची कविता पाठवलेली होती.तर ७० वर्षानंतर दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कवी कट्टा या मंचावर कविता सादर करण्यासाठी कवी माणिक सोनवणे यांची पाऊसपाणी कविता अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या समितीने निवड केली आहे.

यावर्षी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मान सरहद पुणे या संस्थेला मिळाला आहे.तर हे संमेलन छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी तालकटोरा स्टेडियम नवी दिल्ली येथे २१,२२ व २३ फेब्रुवारी २०२५ रोजी असे ३ दिवशीय होणार आहे.

तर कवी माणिक सोनवणे यांच्या पाऊसपाणी कवितेचं सादरीकरण्यासाठी २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ६ या वेळेत होणार असल्याचे साहित्य मंडळाने पत्र पाठवून आमंत्रित केलेले आहे.कवी माणिक सोनवणे यांच्या कवितेची निवड अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाने सलग तिसऱ्यांदा केलेली आहे.या अगोदर वर्धा येथे झालेल्या ९६ व्या अ.भा.म.साहित्य संमेलनासाठी राखोळी तर अमळनेर येथे झालेल्या ९७ व्या अ.भा.म.साहित्य संमेलनासाठी धुळपेरणी कवितेची निवड झालेली होती.

तर या वर्षी दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अ.भा. साहित्य संमेलनाच्या कवी कट्टा या मंचावर कविता सादर करणासाठी पाऊसपाणी कवितेची निवड करण्यात आलेली आहे.करिता कवी माणिक सोनवणे यांचं कौतुक व अभिनंदन गावनागरिक व साहित्य वर्गातून होताना दिसत आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ७१/२०२५

अर्जदार : १. शोभाबाई भ्र. कैलास दंडगव्हाळ, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, २. गोकुळ पि. कैलास दंडगव्हाळ, वय ४२ वर्ष, धंदा शेती, दोघेरा. भालगाव, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३. सिमा भ्र. शरद येवलेकर, वय ४० वर्ष, धंदा घरकाम, रा. चितळी, ता. राहता, जि. आहिल्यानगर, ४. माधुरी भ्र. चंद्रशेखर दाभाडे, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, रा. चिकलठाण ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर,

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस. के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ४ यांची आई असुन अर्जदार क. १ चे पती म्हणजेच अर्जदार क. २ ते ४ चे वडील नामे कैलास पि. गंगाधर दंडगव्हाळ हे दिनांक ३०/११/२०२४ रोजी मौजे भालगाव, ता. गंगापुर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयताचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत कैलास यांचे आई वडील हे दोघेही फार वर्षापुर्वीच मयत झालेले आहेत.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक २८/०१/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधिश क.स्तर गंगापुर न्यायालय गंगापुर**

सिव्हील एम.ए. ६६/२०२५

अर्जदार : १) आशा किशोर लोहकरे, वय ४१ वर्ष धंदा-घरकाम, रा. कमळापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) सुशिल किशोर लोहकरे, वय १९ वर्ष धंदा-शिक्षण, रा. कमळापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) प्रेम किशोर लोहकरे, वय १६ वर्ष धंदा-शिक्षण, अ.पा.क आई रा. कमळापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) बाबुराव शेकु लोहकरे, वय-७५ वर्ष धंदा- शेती, रा. कमळापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार- निरंक

प्रकरण- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेबाबत.

उपरोक्त विषयी सर्वत्र कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. श्री.जी.बी.चव्हाण यांचे मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र. १ ही अर्जदार नं. २ व ३ ची आई आहे. अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल व अर्जदार नं. ४ यांचा मुलगा किशोर बाबुराव लोहकरे हा दि.०९/१०/२०२४ रोजी मयत झालेले आहे. मयताची आई सुनंदाबाई बाबुराव लोहकरे या ०५/०१/२००५ रोजीच मयत झालेले आहेत. अर्जदार नं. १ ते ४ यांचे व्यतिरिक्त मयतास कुणीही इतर वारसदार नाही. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करून मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक १२/०३/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २८/०१/२०२५ रोजी दिले.

वरिष्ठ / कनिष्ठ लिपीक    सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ७३/२०२५

अर्जदार : १) गिरजाधर किसन टाके, वय ५५ वर्षे, धंदा शेती रा. अकोलीवाडगाव ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) राजेंद्र किसन टाके, वय ५१ वर्षे, धंदा शेती रा. अकोलीवाडगाव ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सुमनबाई भ्र. मच्छिंद्रनाथ काळे, वय ६० वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. जातेगाव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम ३७२ भारतीय वारसा कायद्यान्वये वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम.डी. तांबे यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.३ ही अर्जदार क्र.१ व २ यांची सख्खी बहिण आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील नामे किसनराव कोंडीराम टाके हे मौजे अकोलीवाडगाव ता. गंगापुर येथील कायमचे रहिवाशी होते ते दिनांक ३०/०७/२०२४ रोजी मौजे अकोलीवाडगाव ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नामे आसराबाई किसनराव टाके ह्या देखील दिनांक २९/१२/१९९७ रोजी मयत झालेल्या आहे. मयत किसनराव कोंडीराम टाके यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही दुसरे कायदेशीर वारसदार नाही. मयत किसनराव कोंडीराम टाके यांचे नाचे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा महालगाव ता. वैजापुर येथे बचत खाते क्र.०००००५५१२४००३६७२ असा असून सदरील खात्यामध्ये रक्कम रुपये १,९८,५६९/ (अक्षरी एक लाख अठ्यान्नव हजार पाचशे एकोनसत्तर) आजपर्यंत जमा असुन ती रक्कम मिळण्यासाठी अर्जदार यांनी वरील अर्ज या न्यायालयात मयताचे वारसप्रमाणपत्र मिळणे कामी सादर केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २८/०१/२०२५ दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक    सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## श्री स्वामी विवेकानंद शाळा व जुनिअर कॉलेज मंगरूळ येथे सरपंच निवृत्ती वरपे यांच्या हस्ते ध्वजारोहण



सिल्लोड प्रतिनिधी : ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रमुख पाहुणे मंगरूळ गावचे सरपंच निवृत्ती केशव वरपे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा किशोर नागरे यांची उपस्थिती होती तर शाळेच्या मुख्याध्यापिका सोनाली नागरे हेही उपस्थित होते यावेळी शाळेमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाला गावातील पालकांची उपस्थिती पुढील प्रमाणे होते प्रकाश साखरे सोमीनाथ शिरसाठ सोमनाथ मोरे रामेश्वर गोडसे जुबेर शहा पांडुरंग नागरे शिवाजी ढोरमारे महादू रानमाळ शांताराम काटकर राहुल दामोदर शिवाजी आगळे द्वारकादास गोडसे इत्यादी पालकांची उपस्थिती होती

## सोयगावातील कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालयात माजी नगराध्यक्ष कैलास काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ जानेवारी : सोयगाव येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक समिती संचलीत,कला विज्ञान वाणिज्य निवासी महाविद्यालयात रविवारी भारतीय प्रजासत्ताक ७६ व्या दिनानिमित्त माजी नगराध्यक्ष कैलास काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राजेंद्र जावळे,सुनिल गवांडे,मंगेश सोहनी,मयूर मंनगटे,संजय मंडवे,सजय मनगटे,संजय मोरे,सुनील ठोंबरे,संजय पाटील, महेश मानकर,दिपक पाटील,प्राचार्य अनुराधा पवार.प्रा अमोल आगे,आशिष पाटील,विजय देसाई,स्वप्नील पाटील,गणेश वामने,ऋषिकेश निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

## सिल्लोड येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण



सिल्लोड (प्रतिनिधी) : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ वा वर्धापन दिनानिमित्त सिल्लोड येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पार पडला. याप्रसंगी माजीमंत्री आ. अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीवर आधारित पथनाट्य सादर केले. त्यानंतर आ.अब्दुल सत्तार यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी विविध विषयांवर चर्चा केली. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयात आयोजित आरोग्य तपासणी शिबिरास आ. अब्दुल सत्तार यांनी भेट दिली.

यावेळी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव तायडे, संचालक नंदकिशोर सहारे, माजी नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम, राजेंद्र ठोंबरे, किशोर अग्रवाल, दुर्गाबाई पवार, सुदर्शन अग्रवाल आदिंसह सर्व शासकीय कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व नागरिकांची उपस्थिती होती.

## भगवती विद्यालयमध्ये स्व. प्रा. कचरु झारगड यांची पुण्यतिथी साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ जानेवारी : भगवती विद्यालय, बिडकीन येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संस्थापक स्वर्गीय प्रा. कचरू झारगड ( मा. शेळी मेंढी विकास मंडळ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष )यांची आकरावी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रथम विद्यालयाचे मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर यांनी प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात केली.

याप्रसंगी स्वर्गीय प्रा झारगड यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे विद्यार्थ्यांनी केली,मुख्याध्यापक राशींनकर यांनी त्यांच्या कार्याचे स्मरण करून कृतज्ञता व्यक्त केली, खुशाल चव्हाण, रायभान रक्ते यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कार्याविषयी माहिती दिली. कश्र्यर्क्रमप्रसंगी मुख्याध्यश्रपक राशींनकर यांच्याकडून विद्यार्थ्यांना फळ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीधर जऱ्हाड सर यांनी केले तर आभार प्रदर्शन रामनाथ धनवे सर यांनी केले. कार्क्रम यशस्वी करण्यासाठी सुनील पवार, श्रीम, विश्रांती सलगरे,आप्पासाहेब किसवे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले. पसायदानाणे कार्यक्रमाची सांगता झाली.

## दिखोगे तो बिकोंगे मोहीमेची सुरूवात

ॲमेझॉन इंडियाने दिखोगेतो बिकोगे (याचा अर्थ 'जर तुम्ही सर्वांना दिसलात तर तुमच्याकडील गोष्टी विकल्या जातील') ही भारतातील छोट्या व्यवसायांना ॲमेझॉनच्या डिजिटल मार्केटप्लेसवर विक्री करणे कसे सोपे आणि परिणामकारक आहे याविषयीची जागरूकता मजबूत करण्यासाठी नवीन ब्रँड मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत तीन क्रिएटिव्ह आणि विनोदी जाहिराती समाविष्ट आहेत. यातील प्रत्येक जाहिरात एका वेगळ्या परिस्थितीचे चित्रण करते, जिथे विक्रेते त्यांच्या उत्पादनांचा प्रचार करण्यासाठी आणि विक्रीसाठी नेहमीपेक्षा वेगळे मार्ग अवलंबतात. या व्हिडिओंमध्ये ॲमेझॉनच्या मार्केटप्लेसचे विक्रेत्यांसाठी असलेले फायदे दाखवले आहेत, जसे की मोठा ग्राहक वर्ग, भारतातील १००% सेवा-योग्य पिन कोड्स आणि १८ हून अधिक जागतिक बाजारपेठामध्ये प्रवेश. ऑनलाइन विक्री अधिक सुलभ आणि प्रभावी बनवतही ही मोहीम सर्व प्रकारच्या व्यवसायांना सक्षम बनवण्याबाबत ॲमेझॉनच्या वचनबद्धतेवर भर देते. या मोहिमेचे डिझाईन, संकल्पना आणि निर्मिती एनोर्मस ब्रांड्स एलएलपी ने केली आहे.

# आत्याधुनिक लेजर-शो सह संत ज्ञानेश्वर उद्यान सुरू

## पर्यटकांना मिळणार समाधान : खासदार भुमरे



तभा वृत्तसेवा

पैठण दि २८:- वारंवार उद्घाटन तारखेचा घोळ झालेल्या जगप्रसिद्ध संत ज्ञानेश्वर उद्यान २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर सायंकाळी पर्यटकांसाठी खुले करण्यात आले. उद्यान उघडताच तासाभरात याठिकाणी हजारो पर्यटकांची झुंबड उडाली.

उद्यानात नाविण्याने तयार करण्यात आलेल्या संगीत कारंजे लेझर शो ने पर्यटकांना चांगलीच भुरळ घातली. भविष्यात याठिकाणी पर्यटकांसाठी नाविन्यपूर्ण मनोरंजनासह वाटर पार्क ,एडव्हेंचर पार्क ,मेडिटेशन सेंटर,शॉपिंक सेंटर सह आणखीन बऱ्याच सुविधा देण्याचा मानस असल्याची माहिती खासदार संदीपान भुमरे यांनी दिली. यावेळी राज्य दूध महासंघाचे संचालक नंदालाल काळे, कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, उपविभागीय अभियंता दीपककुमार डोंगरे, शाखा अभियंता तुषार विसपुते मार्टिन दास यांची उपस्थिती होती.

मेंटेनन्स आणि ईतर कारणांमुळे बंद असलेले संत ज्ञानेश्वर उद्यान तब्बल आठ वर्षांनी पर्यटकांसाठी उघडण्यात आले. खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या माध्यमातून याठिकाणी अनेक विकास कामे होत असून पहिल्याच टप्यात प्रेक्षकांसाठी हे उद्यान उघडण्यात आले. उद्यानात भेट देणाऱ्या पर्यटकांनी वर्षानुवर्षे पूर्वी उद्यानाला दिलेली भेट आणि आता दिलेली भेट यात सांगड घालत उद्यानाला मिळालेल्या नवीन रूपाचे कौतुक केले. महिन्याच्या दर सोमवारी मेंटेनन्ससाठी उद्यान बंद राहणार असून ईतर दिवशी उद्यान जनतेसाठी सुरू राहणार आहे. उद्यानातील तिकीट दर हे सध्या ३० रुपये प्रतिव्यक्ती असे ठेवण्यात आले आहे.उद्यान फ्लॉवरिंग, आकर्षित झाडे आदींचे काम प्रगतीपथावर आहे.यावेळी खासदार संदीपान भुमरे यांच्यासह कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, उपविभागीय अभियंता दीपककुमार डोंगरे, शाखा अभियंता तुषार सातपुते,मार्टिन दास यांचा उद्यान कृती समितीचे सदस्य प्रा संतोष गव्हाणे , रमेश लिंबोरे, संतोष गोबरे, बाळू आहेर आदींच्यावतीने सत्कार करण्यात आला.

## बुलढाणा अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि.बुलडाणा संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.सुकेश झंवर यांची बिनविरोध निवड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ जानेवारी



आशिया खंडातील नावाजलेली आणि विश्वासार्ह अशी बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी आता नव्या नेतृत्वाखाली वाटचाल करत आहे.पतसंस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.सुकेश झंवर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून,या निर्णयामुळे संस्थेच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे.माजी अध्यक्ष सर्वेसर्वा राधेश्याम चांडक (भाईजी) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आदेशानुसार ही निवड करण्यात आली आहे.सुकेश झंवर हे बुलडाणा अर्बनचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने आर्थिक मजबुतीसह तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यात मोठे यश संपादन केले आहे.



देवाच्या आशीर्वादाने व आपल्या सर्वांच्या प्रेम, आशीर्वादाने व सहकार्यने आज मी बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि बुलडाणा संस्थेच्या अध्यक्ष पदी माझी निवड झाली. बुलडाणा अर्बनचा अध्यक्ष होण्यासाठी ज्यांनी मला भरभरून पाठिंबा दिला त्या सर्व कर्मचारी,बुलडाणा अर्बन भागधारकांचे,सल्लागार समितीचे,सदस्यांचे व ग्राहकांचे मी मनापासून आभार मानतो. बुलडाणा अर्बनला अजून उंचिवर नेण्यासाठी व जागतिक दर्जाची संस्था बनविण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहिल. यासाठी आपले सहकार्य लाभेल अशी अपेक्षा करतो आणि पुन्हा एकदा आपले आभार मानतो.

– डॉ.सुकेश झंवर,अध्यक्ष

डॉ.झंवर यांनी राधेश्याम चांडक यांच्या खांद्याला खांदा लावून संस्थेला आशिया खंडात आदर्श मॉडेल बनवले. त्यांच्या निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे.बुलडाणा अर्बनच्या कामगिरीत त्यांनी मोलाची भूमिका बजावली असून,संस्थेला यशस्वीपणे जागतिक पातळीवर नेले आहे.डॉ. सुकेश झंवर हे लोकांच्या मनातील नेते आहेत.संकटसमयी मदतीचा हात देण्याचा त्यांचा स्वभाव,गरजूंना वेळोवेळी आधार देण्याची वृत्ती,आणि नेतृत्वगुणांमुळे ते देश-विदेशात ओळखले जातात.त्यांच्या निवडीने संस्थेच्या सभासदांमध्ये आणि हितचिंतकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.डॉ.झंवर यांची नियुक्ती ही बुलडाणा अर्बनच्या यशाचा नवा अध्याय ठरणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्था नवीन शिखर गाठेल,असा विश्वास सर्वत्र व्यक्त होत आहे.

## श्री.स.भु.बिडकीनमध्ये प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ जानेवारी. : पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला, बिडकीन येथे ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.मुख्य ध्वजारोहण सोहळा डॉ. मिलिंद कोनार्डे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी यांच्या हस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला ,शालेय समितीचे सर्व सदस्य, सरपंच अशोक धर्मे, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे,राजू शिंदे व गावातील सर्व स्तरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. एन.सी.सी.अधिकारी बाबासाहेब सोकटकर यांच्या मार्गदर्शनाखाली व परेड कमांडर यश दिगंबर सर्जे, कल्याणी विजय पडीयाल, वैष्णवी शंकर जाधव यांच्या नेतृत्वाखाली एन.सी.सी विद्यार्थ्यांनी तर स्काऊटर विवेक पिसे व गाईडर सुरेखा जैन यांच्या नेतृत्वाखाली स्काऊट गाईड च्या विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तबद्ध अशी प्रमुख अतिथीना मानवंदना दिली. प्रशालेच्या संगित शिक्षिका संध्या शिंदे, शितल गायकवाड , सुरेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत , राज्यगीत व विविध देशभक्तीपर गीते सादर केली, याप्रसंगी विद्यार्थीनींनी देशभक्तीपर गीतावर नृत्ये सादर केली तर प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी थोरांची ओळख हा अतिशय सुंदर कार्यक्रम सादर केला, विद्यार्थ्यांनी लेझीम,लाठी, दांडपट्टा व कराटे यांची अप्रतिम प्रात्यक्षिके सादर केली , सुवर्णा बैरागी यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थीनी योगासने सादर केली. सुवर्णा बैरागी यांनी अतिशय सुंदर रांगोळी रेखाटली. अनिल साबळे,तुषार अहिरे यांनी फलकलेखन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ज्ञानेश्वर चाटूपळे यांनी केले

# आपल्या हस्तक्षेपाच्या जागा वाढल्या की मराठी भाषेच्या जागा वाढतील : डॉ.दत्ता घोलप

### एमजीएममध्ये 'मराठी भाषा : रोजगाराच्या संधी' विषयावरील व्याख्यान संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२८ : मराठी माणूस म्हणून आपल्या जेवढ्या हस्तक्षेपाच्या जागा वाढतील तेवढ्या त्या जागा भाषेच्या वाढलेल्या असतील. या प्रक्रियेतून जात असताना आपण समृद्ध झालो,आपला व्यवसाय समृद्ध झाला की भाषा समृद्ध होत जाते, असे प्रतिपादन मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे संपादकीय सहाय्यक डॉ.दत्ता घोलप यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा मराठी भाषा विभाग, एमजीएम रेडिओ ९०.८ एफएम आणि भाषा संचालनालय विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रुक्मिणी सभागृह येथे 'मराठी भाषा : रोजगाराच्या संधी' या विषयावर मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे संपादकीय सहाय्यक डॉ.दत्ता घोलप यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात



आले आहे. यावेळी, श्री. घोलप यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, भाषा संचालनालयाचे सहायक भाषा संचालक चिंतामण वसावे, संचालक डॉ.के.पी.सिंग, प्रा. मारोती गायकवाड, प्रा. राम गायकवाड, रेडिओचे केंद्रप्रमुख सुनील शिरसिकर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.दत्ता घोलप म्हणाले, मराठी भाषेत आजही रोजगार उपलब्ध असून प्रत्यक्ष व्यवहारात उपयोगी असणारी कौशल्य घेऊन आपण काम करणे आवश्यक आहे. आज संहिता लेखन, जाहिरात क्षेत्र, प्रकाशन व्यवसाय, पुस्तक लिहिणे, अनुवाद असे असंख्य पर्याय मराठी भाषेतील करियरसाठी आपणास उपलब्ध आहेत.

समाज न्याहाळण्याचा डोळा जोपर्यंत आपल्याला कळत नाही तोपर्यंत आपल्याला कोणत्याच गोष्टीचे उपयोगिता मूल्य लक्षात येत नाही. ग्राहक मानस शास्त्र समजणे आवश्यक असून त्यानुसार व्यवहार करणे या गोष्टी भाषेला जोडलेल्या आहेत. आज एखाद्या विशिष्ट क्षेत्रात आपण शिक्षण शिकले म्हणजेच नोकरी मिळते अशी आता करियरची झापडबंद रचना नाही. आजचे विद्यार्थी हे खुल्या जगातील विद्यार्थी असून कोणत्याही क्षेत्रात ते स्वतः चे करिअर आणि व्यवसाय करू शकतात. सजग वाचन आणि शोधक नजर आपल्याकडे असेल तर आपण कोणताही व्यवसाय करू शकतो. मात्र, यासाठी कसोटी, कौशल्य आणि संबंधित व्यवसाय करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती आपल्याकडे असणे गरजेचे असल्याचे डॉ. दत्ता घोलप यांनी यावेळी सांगितले. यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. विलास सपकाळ म्हणाले, एमजीएम विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अमलबजावणीमुळे आज विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थी मराठी भाषा शिकत आहे. आपण आपल्या भाषेचा आदर करत असताना इतर भाषेचा सन्मान करत त्या भाषा शिकायला हव्यात.

## बी एस पाटील माध्यमिक विद्यालयमध्ये प्रजासत्ताक दिन उत्सव साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ जानेवारी कर्मवीर बी एस पाटील माध्यमिक विद्यालय जडगाव ता.जि छत्रपती संभाजीनगर शाळेत ध्वजारोहण उत्साहात साजरा करण्यात आले. तसेच ध्वजारोहणानंतर सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आला यामध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत , समाज प्रबोधन नाटक सादरीकरण केले प्रजासत्ताक दिनानिमित्त घेतलेल्या क्रीडा सप्ताहाचे बक्षीस वाटप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे पंचायत समिती सदस्य रामकिसन भोसले , सरपंच निर्मला भोसले, उपसरपंच कृष्णा भोसले,सर्व ग्रामपंचायत सदस्य, पालक वर्ग व समस्त ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक हिवर्डे डि के प्रस्तावना, गुंठाळ एस,डी , सूत्रसंचालन .गावंडे के यु, आभार .राठोड एस पी कार्यक्रमाचे नियोजन जाधव मॅडम, निकम एस एस, जाधव पी के, जगताप व्हीं आर यांनी केले.

## नाथसागर धरणावर ४९ वर्षीय व्यक्तीची आत्महत्या

तभा वृत्तसेवा

पैठण दि २८ :- नाथसागर जलाशयात त्रिंबक कडुबा धोत्रे वय ४९ वर्ष रा. नेवपुर ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी २७ जानेवारी रोजी आत्महत्या केली असून धरणाच्या साखळी क्रमांक १०२ जवळ त्यांचा मृतदेह पाण्यात मिळून आला. याठिकाणी पोलिसांनी मृतदेहाला बाहेर काढले असता त्यांना मयताजवळ चिठ्ठी सापडल्याची माहिती असून याप्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल श्रीराम चेडे हे करीत आहेत.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकिन येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ जानेवारी दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे , आनंदा ठाणगे, कल्याण शिंदे , राजेक अली सर तसेच संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल सर व यश जैस्वाल यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारत माता यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर लगेच ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत घेऊन भारतीय संविधानाची उद्देशिका वाचन घेण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी मुलांना मार्गदर्शन केले. मुलांनी आपल्या उत्कृष्ट शैलीतून वेगवेगळे देशभक्तीपर भाषण सादर केले तसेच देशभक्तीपर गीत गायन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानावर आधारित गीत गायन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी व संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल, यांनी मुलांना बिस्किट वाटप केले.कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेचे प्राचार्य अभिजीत इंगळे , दर्शना कोकणे, सुनिता चव्हाण , दिक्षा साबळे , ओसीन शिंदे, जयश्री नजन, आरती इंगळे, शिवानी ठाकूर, सीमा वंजारे या सर्व शिक्षकांनी खूप परिश्रम घेतले.

## प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भारतमाता पुजन व संविधान प्रतिकृती वाचन



तभा वृत्तसेवा

बिडकीन.दि २८ जानेवारी बिडकीन येथील खंडोबा मंदिर व मारवाडी गल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तर्फे भारत माता पूजन तसेच संविधान उद्देशिका वाचन करण्यात आली. त्यावेळी सरपंच अशोक धर्मे, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते व स्वयंसेवक गणेश काळे, भाजप शहराध्यक्ष गणेश दाणे, बाबासाहेब धर्मे .भागवत ठाकूर, भारत धर्मे, गणेश काळे, हरीनारायण कोरडे, सुभाष डुबे, दिगंबर सर्जे, अभिजीत ढाकेफळे, बाबासाहेब धर्मे, संतोष तोतला, सुनील गडदे,शुभम औटी, किशोर धर्मे, योगेश शेटे, कैलास शिंदे,चारणसिंग राठोड,भागचंद कोथिबिरे, मच्छिंद्र भालेकर,आदींसह बिडकीन व परिसरातील समाजबांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. बिडकीन सह परिसरातील शिवाणी, निलजगाव, बोकुडजळगाव. पान रांजणगाव सह विविध खेड्यापाड्यातील ठिकठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मुदखेड नगर परिषद मुदखेड जि. नांदेड

जा.क्र. मुनपा/ताशा/विकास/२०२४-२५/१६८ दिनांक २७/०१/२०२५

ई-निविदा सुचना (क्रं. ०२/२०२४-२५)
(तिसरी वेळ)

स्वच्छता विभाग

मुदखेड नगर परिषद अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत घनकचरा प्रकल्प येथे Compost Pit With Shed, MRF Shed, Sanitary Landfill, Leachate Tank विषयक बांधकाम करणे करिता ऑनलाइन पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. अटी व शर्ती सह सविस्तर ई-निविदा प्रपत्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०७/०२/२०२५ रोजी १६:०० वाजे पर्यंत मागविण्यात येत आहे. तरी सर्व कंत्राटदारानी नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
न.प.मुदखेड जि.नांदेड

## अग्रलेख...

# प्रदूषण, भारतीय संस्कृती आणि आम्ही!

दूषित पाण्यापेक्षा दूषित हवेमुळे जगात अधिक लोकांचा मृत्यू होतो, हे ऐकून आता आश्चर्यही वाटेनासे झाले आहे. दिवसेंदिवस जगातील बहुतांश देशांमधील हवा प्रदूषित होत चालली आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतील प्रदूषणाची चर्चा संपूर्ण देशभर झाली. प्रदूषणाचा स्तर एवढा वाढला होता की, राजधानीतील शाळा आठवडाभर बंद ठेवाव्या लागल्या. राजधानी दिल्लीतील प्रदूषणामुळे तेथील नागरिकांचे आयुष्य साडेसहा वर्षांनी कमी होण्याचा धोका आहे, असा जो निष्कर्ष काढण्यात आला आहे, तो आम्ही गांभीर्याने घेतला नाही, तर आमचा भविष्यकाळ कठीण आहे. मोठ्या प्रमाणावर लाकडं जाळली जाणं, शेतातील पिकांचे अवशेष जाळले जाणे, भेसळयुक्त इंधनाचा अतिवापर केला जाणं, वाहतूक कोंडीमुळे रस्त्यांवर उभ्या राहणाऱ्या वाहनांमधून मोठ्या प्रमाणात कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडणं, या व अशा अनेक कारणांमुळे भारतात हवा प्रदूषित होते. दिल्लीच्या आकाशात मध्यंतरी जो प्रचंड धूर होता, तो हरयाणा-पंजाबमधील शेतकरी पिकांचे अवशेष जाळत असल्यामुळे आला होता. हवा वेगवान असेल आणि हवेची दिशा दिल्लीकडे असेल तर तिकडचा धूर दिल्लीच्या आकाशात पसरतो आणि तिथल्या प्रदूषणाचा स्तर वाढून नागरिकांना त्रास होतो, हा अनुभव आहे. कचरा जाळण्यास बंदी असतानाही तो मोठ्या प्रमाणात जाळला जातो. कचरा व्यवस्थापन नीट न करता तो जाळण्यात आला, तर त्यातून जे अनेकविध विषारी वायू बाहेर पडतात, ते शुद्ध हवेत मिसळतात आणि हवा अशुद्ध होते. या अशुद्ध हवेलाच आम्ही प्रदूषण म्हणतो. आम्हाला हे प्रदूषण कशामुळे होते हे माहिती आहे, त्यावरील उपायही माहिती आहेत, पण आम्हाला ते करायचे नाहीत आणि दूषणं मात्र देत राहायची, ही आमची सवय आहे. देशातल्या लोकांचे जे सरासरी आयुष्मान आहे, ते तीन ते चार वर्षांनी कमी होत आहे आणि राजधानी दिल्लीतल्या नागरिकांचे आयुष्मान साडेसहा वर्षांनी कमी होत आहे, हीसुद्धा जर आम्ही गंभीर बाब मानत नसू तर आम्ही कोणत्या बाबतीत गंभीर आहोत, हा प्रश्नच आहे. प्रदूषण ही काही आता आपल्याच देशातील चिंता राहिली आहे, असे नाही. संपूर्ण जग वाढत्या प्रदूषणामुळे चिंतित आहे. परंतु, वाढलेले प्रदूषण कमी करण्याच्या संदर्भात जे संभाव्य उपाय आहेत, त्यावर कोणी गांभीर्याने चिंता करताना दिसत नाही. आपल्याकडे आपल्या नागपूरचे खासदार आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी कायम या विषयावर चिंता करताना दिसतात, त्यावर उपाय करण्यासाठी पुढाकार घेताना दिसतात. जेवढी वाहने आहेत, ती सगळी जैवइंधनावर चालवावीत असा त्यांचा आग्रह आहे. त्याचप्रमाणे पुढल्या काळात वाहने इलेक्ट्रिकवर चालावीत, हाही त्यांचा प्रयत्न आहे. वाहनांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना त्यांनी आधीच इशारा दिला आहे. भविष्याचा वेध घेणारा आणि त्यानुरूप नियोजन करणारा नितीन गडकरी यांच्यासारखा नेता देशातल्या प्रत्येक जिल्ह्याला लाभला तर प्रदूषणच काय, पण सगळ्याच समस्या संपुष्टात येतील. इथेनॉलचा वापर करण्यावरही नितीन गडकरी भर देताना दिसतात. पण, त्यांच्या प्रयत्नांना हरताळ फासण्याचे काम आपल्याच देशातील स्वार्थी लोक करीत आहेत, हे दुर्दैवच! मात्र, गडकरी हे जिद्दी आणि परिश्रमी आहेत. एक दिवस त्यांचे प्रयत्न नक्कीच यशस्वी होतील आणि आम्हाला 'अच्छे दिन' अनुभवास येतील, याची खात्री आहे. आमची भौतिक सुखाची भूक वाढली आहे. त्यामुळे आधुनिकता आणि प्रगतिशीलतेच्या नावावर निसर्गाचे प्रचंड शोषण आम्ही करीत आहोत. जोपर्यंत आम्ही निसर्गाचे शोषण थांबवत नाही, तोपर्यंत समस्येवर तोडगा काढण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अंधारात सुई शोधण्यासारखे कठीण काम आहे. आम्ही आमच्या आचरणानेच निसर्गाचे संतुलन बिघडवत आहोत, याचा आम्हाला सोईस्कर विसर पडत आहे. हिरवीगार वनं तर आता दुर्मिळच होत चालली आहेत. आज आपल्या महाराष्ट्राचाच विचार केला तर जंगलाचे प्रमाण हे २०-२१ टक्के आहे. पण ते विदर्भात असलेल्या ४६ टक्के जंगलांमुळे आहे. विदर्भ जर महाराष्ट्रापासून वेगळा केला तर महाराष्ट्रातले जंगल दहा टक्के तरी असेल का, याची शंकाच वाटते. जंगलंच काय, देशातल्या अनेक बारमाही वाहणाऱ्या नद्याही कोरड्या पडल्या आहेत. ज्या नद्यांमध्ये आज पाणी दिसते आहे, ते वीस वर्षांआधी दिसत होते, त्याच्या अर्धेही दिसत नाही, ही बाब चिंताजनक आहे. अनेक नद्यांचे प्रवाहच थांबल्यासारखे झाले आहेत. एकीकडे हवेचे प्रदूषण आणि दुसरीकडे पाण्याचा अभाव, उपलब्ध असलेल्या पाण्यापैकी अर्धे पाणी दूषित असणे आणि त्यामुळे अनेक प्रकारच्या व्याधी होणे, ही बाब आता नित्याची झाली आहे. शेतीचेही आता वेगाने यांत्रिकीकरण होत आहे. शेतात यंत्र चालविले जात असल्याने आणि उत्पादकता वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने जमिनीचा कसही कमी होत चालला आहे. कीटकनाशकांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने फळे, भाजीपाला, अन्नधान्याच्या माध्यमातून माणसाच्या शरीरात विषारी घटक प्रवेश करीत असल्यानेही नवनव्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. जे किडे आम्ही कधी बघितले नव्हते, ते अनेक प्रकारचे नवीन कीटक आम्हाला त्रास देऊ लागले आहेत. दरवर्षी जगात कुठल्या तरी देशात प्रदूषणावर चिंता व्यक्त करण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. जगभरातील प्रतिनिधी तिथे येतात, आपापली मतं मांडतात अन मायदेशी परततात. परिणाम? शून्य! आमचे जे पूर्वज होते, ऋषी-मुनी होते, त्यांनी निसर्गाच्या संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले होते. त्यांनीच आमच्यावर निसर्ग संरक्षणाचे संस्कारही केले होते. निसर्गाच्या विनाशामुळे जे भयावह परिणाम होत आहेत, त्यातून भारतीय संस्कृतीच आम्हाला वाचवू शकते, ही बाब जगभर स्वीकारली गेली होती. परंतु, दुर्दैवाने आम्ही भारतीयच भौतिकतेच्या मागे धावताना स्वसंस्कृती विसरत चाललो आहोत, विनाशाच्या मार्गावर अग्रेसर होत आहोत. दरवर्षी कोट्यवधी झाडं लावण्याचा प्रयत्न करूनही जंगलांची कटाई मोठ्या प्रमाणात होत असल्याने निसर्गाचा समतोल बिघडतोच आहे. देशात एकीकडे नद्या कोरड्या पडत असतानाच देशातील सगळ्यात मोठी असलेली नदी स्वच्छ करण्याची अतिशय महत्त्वाची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नितीन गडकरी यांच्यावरच सोपविली होती. हा नितीन गडकरी यांचा जसा गौरव होता, तसाच तो नागपूर-महाराष्ट्राचाही सन्मान होता. गडकरी यांनी पहिल्या कार्यकाळात केंद्रीय जलसंसाधन खात्याचा कार्यभार स्वीकारताच अतिशय वेगाने निर्णय घेत गंगा नदी स्वच्छता अभियान हाती घेतले होते. गंगेचे स्वच्छ झालेले पाणी काँग्रेसच्या खासदार प्रियांका वढेरा यांनी प्यायले होते, हेही आपल्याला स्मरत असेलच. गंगा नदी स्वच्छ करण्याचा बहुमान एका नागपूरकराला मिळाला होता, ही आमच्यासाठी आनंदाची बाब होती. जी जबाबदारी मिळाली, ती कटाक्षाने पार पाडायची, हा गडकरी यांचा स्वभाव आहे. या स्वभावाला अनुसरून ते गंगा नदी शुद्ध करतील अन् गंगा खोऱ्यातील नागरिकांचे जीवनमान सुधारतील, याबाबत मोदी यांना खात्री होती म्हणूनच त्यांनी जबाबदारी सोपविली होती. अफाट कल्पनाशक्तीचे आणि अचाट राजकीय इच्छाशक्तीचे धनी असलेले नितीन गडकरी यांच्यासारखे नेते आपल्या देशात असताना आम्ही अनेकदा विदेशी तज्ज्ञांना पाचारण करतो आणि त्यांच्यावर पाण्यासारखा पैसा खर्च करून पदरात काहीच पाडून घेत नाही, हे सगळ्यात वेदनादायी होय. अपेक्षा करू या सगळे काही ठीक होईल अन जुने वैभव आपण प्राप्त करू!

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# बांगलादेशींची बनावट कागदपत्रे

अनेक बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांद्वारे आधारकार्ड व पारपत्र (पासपोर्ट) बनवल्याचे आढळून आले आहे. आधारकार्ड किंवा पासपोर्ट मिळविणे ही एक गुंतगुंतीची प्रक्रिया आहे. सर्व कागदपत्रे योग्य स्वरूपात असली, तरी अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. इथे तर सुरुवातीपासूनच खोटेपणा करीत जावे लागते. गेल्या तीन वर्षांत मुंबई पोलिसांनी सुमारे १००० बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. ही तोतयागिरी बेमालूमपणे कशी चालू शकली, हे एक कोडेच आहे. स्थानिक पातळीवर मदत देणारे तत्पर असल्याशिवाय हे साध्य होऊ शकत नाही.

नववर्ष नुकतेच सुरू झाले आहे. पहिल्याच १५ दिवसांमध्ये मुंबईतून ८० हून अधिक बांगलादेशी घुसखोरांना मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांना मिळालेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. पण घुसखोरांना मदत करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना पकडणेही आवश्यक झाले आहे. तीन वर्षांमध्ये मुंबईतून सुमारे १००० हून अधिक बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे. हे घुसखोर आता चांगलेच सरावले असल्याचे लक्षात आले आहे. काही दिवसांपूर्वी दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) ॲप्लिकंट ट्रॅकिंग सिस्टिमच्या आधारे अटक केलेल्या काही घुसखोरांनी बेकायदेशीररीत्या भारतीय नागरिकत्व मिळवून लोकसभा निवडणुकीत मतदान केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. हे बांगलादेशी घुसखोर भारतीय पारपत्रावर परदेशात नोकरीसाठीही जाऊन आले होते, ही तर कमालच म्हणायला हवी. कायद्याचे पालन करणाऱ्या सामान्य माणसाला सरकारी दाखले किंवा शिधावाटप पत्रिका मिळविण्यासाठी शासकीय कार्यालयात अनेकदा खेटे घालावे लागतात. संबंधितांचे हात ओले केल्याशिवाय कागदपत्रे समोर सरकतच नाहीत. मात्र, बांगलादेशातून घुसखोरी करून आलेल्यांची कमाल बघा; त्यांना सहज कागदपत्रे मिळतात.

मुंबईसारख्या प्रचंड मोठ्या शहरात अनेक बांगलादेशी घुसखोर असणार, हे नक्की. याला लागून असलेल्या भागातही त्यांची संख्या खूप मोठी असणार, हेही स्पष्ट आहे. राज्यातील सर्वच पोलिस यंत्रणांनी घुसखोरांविरोधात विशेष मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. याशिवाय पोलिस ठाण्यांच्या पातळीवरही दहशतवाद विरोधी कक्षाला (एटीसी) बांगलादेशी नागरिकांविरोधात कारवाई करण्याची मोहीम हाती घ्यावी लागणार आहे.

भारताच्या भूसीमांची (लॅण्ड बॉर्डर्स) एकूण लांबी ठोकळमानाने १५,१०७ किलोमीटर असून समुद्रकिनारा ७,५१७ किलोमीटर आहे. त्यापैकी भूसीमेचे विभाजन बांगलादेश ४,०९७, चीन ३,४८८, पाकिस्तान ३,३२३, नेपाळ १,७५१, म्यानमार १,६४३, भूतान ६९९ आणि अफगाणिस्तान १०६ किलोमीटर असे आहे. भारत आणि बांगलादेश यातील ४०९७ किलोमीटर आंतरराष्ट्रीय सीमा जगातली पाचव्या क्रमांकाची लांब सीमा आहे. यापैकी आसामला लागून असलेली सीमा २६२, त्रिपुराला ८५६, मिझोरामला ३१८, मेघालयला ४४३ आणि पश्चिम बंगालला २२१७ किलोमीटर अशी आहे. एकूण ४,०९७ किलोमीटर सीमेपैकी ३,१४५ किमी सीमेवर कुंपण घालण्याचे काम पूर्ण झाले आहे. उरलेल्या सीमेवर प्रत्यक्ष (फिजिकल) आणि अप्रत्यक्ष (नॉन-फिजिकल) अडथळे उभारण्याचे काम सुरू आहे. भारत आणि बांगलादेश यातील सीमा अनेक ठिकाणी प्रवेशसुलभ (पोरस) असून त्यामुळे सीमेपलीकडून बेकायदेशीर कारवाया आणि घुसखोरी रोखण्यात बऱ्याच अडचणी येत असतात, या बाबीची नोंद उभयपक्षी घेण्यात आली आहे. गेल्या पाच वर्षांत जवळजवळ २,५०० बांगलादेशींनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे भारतात प्रवेश मिळविल्याची नोंद आहे. नोंद न झालेले अनेक असू शकतात. अशांचा भारतात शोध घेणे एक जिकिरीचे काम होऊन बसले आहे. घुसखोरांची चेहरेपट्टी भारतीयांशी मिळतीजुळती असते. ते सफाईने बंगाली भाषा बोलू शकतात. त्यांनी वाममार्गाने आधार कार्डही बनवून घेतलेले असते. असे निदान दोन कोटी बांगलादेशी आजमितीला भारतात राहात असतील, असा एक अंदाज आहे. यापैकी अनेक भारतविरोधी कारवाया करताना आढळले आहेत. कुंपण घालणे आणि प्रकाशझोत व्यवस्थेचे काम मार्च २०२४ पर्यंत पूर्ण व्हावयास पाहिजे होते, पण तसे होऊ शकले नाही. केवळ कुंपण घालून घुसखोरी थांबणार नाही. कुंपणाचेही काही नवीन प्रकार आता उपलब्ध झाले आहेत. यात तंत्रज्ञानावर आधारित देखरेख व्यवस्था योजलेली असते. सीमावर्ती भागात रस्त्यांचे जाळे तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. त्यामुळे सीमेजवळ वेगाने हालचाली करणे शक्य होते. अर्थात याचा उपयोग तस्करही करू शकतात, पण त्याला उपाय नसतो.

कुंपण घालतानाही अडचणी येतात. एक प्रमुख अडचण असते लहान लहान ओढे आणि ओहोळांची तसेच मध्येच एखादा खोलगट टप्पा येतो. कधी कधी सीमारेषेपासून १५० यार्डाच्या आत मनुष्यवस्ती असते. ती लोकं आपली जागा सोडायला तयार नसतात. भूमिअधिग्रहणाची प्रकरणे लवकर मार्गी लागत नाहीत. अशा सर्व अडचणी आणि अडथळे पार करीत ४,२२३ पैकी ३,७५१ किलोमीटर लांबीचे सीमेनजीकचे रस्ते बांधून तयार झाले आहेत. उरलेले मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होतील. प्रकाशझोत व्यवस्था पश्चिम बंगाल, मेघालय, आसाम, मिझोराम आणि त्रिपुरा या राज्यातून सीमेलगत केली जात असून ४,२२५ किलोमीटर पैकी ३,०७७ पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. बांगलादेशी नागरिकांची बनावट कागदपत्रे तयार करण्यामागे दोन उद्देश असतात. आपण भारतीय आहोत, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न असतो. दुसरे असे की, भारतीय नागरिक असल्याचा पुरावा त्यांना परदेशात नोकरी मिळविण्यासाठीही उपयोगी पडतो. पुढे यांच्यापैकीच काही लोक 'घुसखोरांना नागरिक बनवण्याचे काम' स्वतंत्रपणे करू लागतात. काहींचा तर हा व्यवसायच होऊन बसलेला आहे. बांगलादेशातून घुसखोरी करून भारतात येण्याचा हा व्यवसाय बहुतेक भारतातील मोठ्या शहरांमध्ये सुरू आहे. याला आज व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरात कुणी बेकार राहात नाही. प्रत्येकाला काही ना काही काम मिळतेच. हा सर्व व्यवहार २५ ते ३० हजारात पूर्ण करता येतो. यापैकी एक रॅकेट मुंबई पोलिसांनी नुकतेच उजेडात आणले आहे. बांगलादेशी नागरिकांना घुसखोरीसाठी मदत करणाऱ्या टोळीचा दिल्ली पोलिसांनीही पर्दाफाश केला असून चार जणांना अटक केली आहे. या टोळीत दोन बांगलादेशी आणि (आपले दुर्दैव असे की) दोन भारतीय नागरिकांचाही समावेश आहे.

भारत आणि बांगलादेश या दोन देशांत जनावरांची ये-जा सुरू असते. यातला एक मार्ग गाढवांचा मार्ग म्हणून ओळखला जातो. एक टोळी बांगलादेशातील लोकांना गाढवाच्या मार्गाने भारतात येण्यास सांगत असे. यानंतर, दुसरा गट या लोकांना रात्रभर लपवून ठेवीत असे. नंतर तिसरा गट त्यांना आसामला घेऊन जायचा. पुढे त्यांना रेल्वेने किंवा इतर मार्गाने दिल्लीला पाठवत. दिल्लीच्या गर्दीत हे घुसखोर सहज मिसळून जात. खऱ्या शरणार्थींना भारताने आजवर उदार मनाने आश्रय दिला आहे. पण हे बांगलादेशी घुसखोर आहेत. त्यांच्यातल्या एकेकाला शोधून हद्दपार करण्याचे किचकट काम भारताला भविष्यात पार पाडायचे आहे.

९४२२८०४४३०


## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# महाराष्ट्राला लाभली उज्ज्वल संतपरंपरा

महाराष्ट्राला उज्ज्वल अशी संतपरंपरा लाभली आहे. अध्यात्मासह समाजप्रबोधन हा संतपरंपरेचा मूलाधार राहिला आहे. संत ज्ञानेश्वर माउलीने या परंपरेचा पाया रचला आणि संत तुकोबारायांनी त्यावर कळस चढविला. महाराष्ट्रात संत नामदेव, रामदास स्वामी, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, गजानन महाराज, साईबाबा, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा असे अनेक संत होऊन गेलेत. रामदास स्वामींनी गावोगावी हनुमानाची मंदिरे स्थापन करण्याचे आवाहन केल्यानेच आज प्रत्येक गावात किमान एक तरी हनुमानाचे मंदिर दिसून येते. १८०० ते २००० या दोन शतकांत भारतात आणि प्रामुख्याने महाराष्ट्रात हजारो संत-महात्मे होऊन गेलेत. संतांच्या याच मांदियाळीतील एक प्रमुख संत म्हणजे केजाजी महाराज होय. आयुष्यभर पंढरीची वारी करणाऱ्या या महान विठ्ठल भक्ताची पुण्यतिथी २९ व ३० जानेवारी रोजी साजरी होत आहे. विदर्भातील प्रतिपंढरी घोराड आणि केजाजी महाराजांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या तरोडा येथे केजाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत.

संतांचे आयुष्य साधेसुधे असले तरी काट्याकुट्यांनी भरलेले असते. संत ज्ञानेश्वर माउलीस लोकांनी खूप छळले. परंतु, त्यांचा निश्चय शेवटपर्यंत ढळला नाही. आयुष्यभर अपमान, उपहास आणि अवहेलना सहन करणाऱ्या ज्ञानेश्वरांनी सृष्टीच्या कल्याणासाठी विधात्याकडे पसायदान मागितले. हीच खरी भारतीय संस्कृतीची ओळख आहे. अन्य संतांनीदेखील खूप हालअपेष्टा भोगल्या. अशाच हालअपेष्टा संत केजाजी महाराज यांच्याही वाट्याला आल्या. केजाजी महाराजांचा जन्म १८४३ साली नागपूर जिल्ह्यातील बेला येथे झाला. उदरनिर्वाहासाठी त्यांचे आईवडील बाल केजाजी यांच्यासह घोराड येथे आले. महाराजांचे वडील इतरांकडे चाकरी करायचे. त्यांच्या मदतीला महाराजसुद्धा अनेकदा जायचे. मात्र, त्यांना लहानपणापासूनच विठ्ठलाची ओढ होती. त्यामुळे कामात व्यस्त असतानाच महाराज विठ्ठलाच्या नामस्मरणात देहभान हरपून जायचे! महाराजांनी घोराड येथून दरवर्षी पंढरपूर पायदळ वारीचा पायंडा पाडला. जो आजतागायत सुरू आहे. संत केजाजी महाराज आणि संत गजानन महाराज एकाच काळात होऊन गेले. गजानन महाराजांनी घोराड नगरी गाठून केजाजी महाराजांची भेट घेतली होती. केजाजी महाराज एकदा असेच देहभान विसरून तरोडा या गावी आले. तरोडावासीयांनी या महापुरुषाची आत्मीयतेने विचारपूस करून आदरातिथ्य केले. तेव्हापासून ते नेहमी या गावात यायचे. मरणासन्न अवस्थेतील गाईचा प्राण वाचविण्यासाठी महाराजांनी विठ्ठलाकडे साकडे घातले होते. या गाईची समाधी आजही तरोडा येथे आहे. इतरांची चाकरी केजाजी महाराजांच्या भाळी ईश्वरानेच लिहिलेली होती. घोराड येथे ते चरितार्थासाठी सालगडी म्हणून काम करायचे. भाविकांच्या विश्वासानुसार केजाजी महाराज जेव्हा ईश्वर भक्तीत पूर्णतः लीन होऊन जायचे तेव्हा प्रत्यक्ष विठ्ठलच त्यांच्यासाठी रानोवनी राबायचा! हा साक्षात्कार पाहिल्यानंतर घोराड येथील संबंधित जमीनदार केजाजी महाराजांना शरण गेला होता.



केजाजी महाराजांनी घोराड येथून सुरू केलेल्या पंढरपूर पायदळ वारीची परंपरा आजही कायम आहे. यवतमाळ जिल्ह्यातील नरेश महाराजांनी बबन महाराजांच्या नेतृत्वात २००४ पासून आळंदी येथून केजाजी महाराजांच्या नावे पंढरपूर दिंडीची प्रथा सुरू केली. कोरोना काळात या प्रथेत खंड पडला परंतु भाविकांनी घोराड या गावालाच पंढरपूर मानून केजाजी महाराजांच्या मंदिराला प्रदक्षिणा घालून नवा पायंडा पाडला. १९०७ मध्ये केजाजी महाराज पुत्र नामदेव आणि काही भक्तांना घेऊन प्रयाग येथे गेले आणि तिथेच मकरसंक्रांतीचे औचित्य साधून महाराजांनी देह ठेवला. केजाजी महाराज गेले. परंतु, या जगाला निष्काम कर्मयोग शिकवून! प्रयाग येथे केजाजी महाराजांची समाधी आहे. महाराजांनी घोराड येथे विठ्ठलाचे भव्य मंदिर बांधले. या घोराड नगरीवर आजही केजाजी महाराजांची मेहेरनजर असल्याचे गावकरी मोठ्या अभिमानाने सांगतात. केजाजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवासोबतच येथे आषाढी, कार्तिकीला मोठी यात्रा भरते. केजाजी महाराजांची मंदिरे नागपूरसह अनेक ठिकाणी आहेत. अशा या निष्काम कर्मयोगी संताला पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी अभिवादन.

९८८१७१६०२७

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# अधिक काम की दर्जेदार काम?

सध्या देशातील काही दिग्गज कंपन्यांचे सीईओ-अध्यक्ष कंपनीतील कर्मचाऱ्यांनी साप्ताहिक ७० तास, ९० तास काम करावे, असे वायफळ सल्ले देत सुटलेले दिसतात. त्यामुळे पुन्हा एकदा अधिक काम की दर्जेदार काम, या चर्चेला तोंड फुटले आहे. त्यानिमित्ताने व्यवस्थापन आणि मानवी संसाधन क्षेत्राच्या दृष्टिकोनातून या विषयाचा ऊहापोह क्रमप्राप्त ठरावे. कामाचे वाढते तास व त्यापोटी येणारा वाढता ताण हे मुद्दे कर्मचाऱ्यांपासून कंपन्यांपर्यंत सर्वांसाठी कायमच जिव्हाळ्याचा विषय. वेगवेगळ्या संदर्भांसह या चर्चेचा मुख्य भर असतो, तो कामाच्या दर्जा आणि उत्पादकतेवर. मात्र, बरेचदा हेच दोन महत्त्वाचे मुद्दे तुलनेने दुर्लक्षित राहतात व त्यावरील चर्चा व त्याद्वारे उत्पन्न होणारा ताणतणाव मात्र वाढत जातो.

सर्वसाधारणपणे कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांचे काम, कामाचे तास व त्याचप्रमाणे कामाचा ताण यावरील चर्चेत दोन मुद्दे प्रकर्षाने पुढे येतात. यामध्ये बदलती व्यावसायिक स्थिती आणि गरजा यांची पूर्तता करण्यासाठी व्यवसाय-व्यवस्थापनापुढे उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून अधिकाधिक काम करून घ्यावे लागते. यातील दुसरा मुद्दा असतो, तो मर्यादित संख्येतील कर्मचाऱ्यांना करावे लागणारे मोठ्या प्रमाणावर व अतिरिक्त काम. यातूनच समस्या निर्माण होते, ती कर्मचाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या वाढीव कामाच्या तासांची. कर्मचाऱ्यांच्या या सातत्याने कराव्या लागणाऱ्या वाढीव काम व कामाच्या तासांचे वाढीव कर्मचारीच नव्हे, तर त्यांचे सहकारी, अधिकारी, कुटुंबातील सदस्य इत्यादींवर कुठल्या ना कुठल्या स्वरूपात निश्चितपणे परिणाम होतात. त्यामुळे अशा प्रश्नांची चर्चा समाजमाध्यमांसह समाजातील विविध स्तरांवर अपरिहार्यपणे होत असते. मध्यंतरीच्या काळातील एक प्रथितयश कंपनीतील उच्च शिक्षाप्राप्त कर्मचाऱ्याने कामाच्या ताणापोटी केलेली आत्महत्या विशेष व व्यापक सामाजिक चर्चेचा मुद्दा ठरला होता. यादृष्टीने व विशेषतः विविध मोठ्या व प्रथितयश कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांनी सद्य:स्थितीत व विविध स्वरूपांतील स्पर्धांवर मात करण्यासाठी प्रसंगी आठवडी ८० ते ९० तास करण्याच्या पृष्ठभूमीवर कर्मचाऱ्यांचे कामाचे तास किती आणि का म्हणून असावे, हा मुद्दा पुन्हा नव्याने चर्चेत आला आहे. त्यादृष्टीने खालील मुद्द्यांवर त्यामुळेच तातडीने विचार व चर्चा करणे गरजेचे ठरते.



**कामाची पद्धत व कार्यसंस्कृती** : कंपनी वा संस्थेअंतर्गत कामकाज व काम करण्याची विशिष्ट पद्धत असते. कंपनीचा व्यवसाय, कामकाजाच्या संदर्भातील प्राधान्य, प्रगत स्वरूपाचे काम करण्यावर दिला जाणारा भर, उपलब्ध तंत्रज्ञान, विविध साधने व उपलब्ध कर्मचारी व संसाधने यांचा यात समावेश असतो.

वर नमूद केलेल्या साधन-संसाधनांद्वारेच कंपनीचा व्यवसाय व कामकाज होत असते. या साधन-तंत्रज्ञान प्रक्रिया, कामकाजाची पद्धती व ते सारे पद्धतशीरपणे व विशिष्ट पद्धतीने व यशस्वीपणे करण्यासाठी जी पद्धत वापरली जाते, त्याला संबंधित व्यवसाय-कंपनीची कार्यपद्धत समजली जाते. या कार्यपद्धती म्हणजेच कामकाज पद्धतीमध्ये कर्मचारी, त्यांचे कामकाज, कामाच्या संदर्भातील त्यांचे कामाचे तास व त्यासाठी त्यांना मिळणारी साधने इत्यादींचा प्रामुख्याने समावेश असतो.

**कामाचे स्वरूप व कामाचे तास** : बदलती परिस्थिती व वाढती स्पर्धा यामुळे विशिष्ट पद्धतीने वा विशेष प्रकारचे काम करणाऱ्यांची कामाचे तास व कामाची तयारी या दोन्हींमध्ये मोठी वाढ झाली आहे. अशा प्रकारच्या जबाबदारीसह करावयाच्या कामामध्ये प्रामुख्याने वरिष्ट पातळीवर काम करणारे व्यवस्थापक, अकाऊंटंट, वकील, डॉक्टर्स, प्रकल्प व्यवस्थापक, बँका-वित्तीय संस्थांमधील अथवा गुंतवणूक कंपन्यांमधील उच्चपदस्थ व मुख्य म्हणजे मध्यम व लघु उद्योजकांचा समावेश करता येईल.

वर नमूद केलेले उद्योग-व्यवसाय व कामकाज यामध्ये काम करणाऱ्याच्या कामकाजाचे व विशिष्ट स्थिती वा परिस्थितीमध्ये काम करणाऱ्यांना अमर्याद स्वरूपात व अथकपणे काम करावे लागते. व्यवसायाची वर्षअखेर निश्चित कालावधीतील व्यवस्थापन, ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा, व्यावसायिक गरजा इत्यादींची पूर्तता करण्यासाठी प्रसंगी प्रदीर्घ तास वा प्रदीर्घ काळ काम करण्याला पर्याय नसतो. मात्र, प्रश्न व समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा अधिकांश कर्मचाऱ्यांना सरसकटपणे व सातत्याने प्रदीर्घ काळ काम करावे लागते. यातून असे वा अशा प्रकारे वाढीव तासांसह काम करण्याची पद्धत व वृत्ती बनू शकते व असे कायमस्वरूपी झाल्यास कर्मचाऱ्यांच्या उद्विग्न होण्यापासून काहीही होऊ शकते, याचा अनुभव नुकताच आपल्या कॉर्पोरेट क्षेत्राने घेतला आहे.

**उत्पादन की उत्पादकता** : उद्योग-व्यवसायाच्या संदर्भात नेहमीच महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे व्यवसायवाढ. उद्योग-व्यवसायाच्या वाढीसाठी व्यवसाय उद्योग असो वा सेवा त्यामध्ये कर्मचारी हा महत्त्वाचा व आवश्यक असा घटक असतोच. याच भूमिकेतून कर्मचाऱ्यांकडे पाहण्याची गरज असते. असा विचार जे व्यवस्थापन करते, त्यांचा व्यवसाय कायमस्वरूपी फायदेशीर ठरू शकतो.

**कामासाठी कर्मचारी की कामाचे कर्मचारी** : बरेचदा कंपनीच्या उच्च पातळीवर व वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर कर्मचारी आणि त्यांचे कामकाज याचा योग्य प्रकारे विचार होत नाही. याची पृष्ठभूमी कर्मचाऱ्यांच्या निवडीपासून कंपनीतील वरिष्ठ व व्यवस्थापनाच्या कर्मचारी आणि त्यांच्या कामाच्या संदर्भातील धोरणात्मक निर्णय व त्यांच्या अंमलबजावणीपर्यंत विविध टप्प्यांमध्ये अनुभवास येते. याचाच परिणाम म्हणून उपलब्ध कर्मचाऱ्यांपैकी काही व मर्यादित कर्मचारी-अधिकारी यांच्यावर स्वाभाविकच कामाचा अधिक ताण पडतो. कामाचा हा ताण व अति ताणतणावासह काम करणे, ही बाब नेहमीची बनून संबंधित ठिकाणी तीच कामकाज पद्धत म्हणजेच कार्यसंस्कृती बनते. त्यादृष्टीने व्यवस्थापक व व्यवस्थापन या उभयतांनी कंपनीच्या कामकाजाच्या दृष्टीने सरसकट कर्मचारी नव्हे, तर कुशल व उत्पादक काम करणारे कर्मचारी कंपनीचा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो, ही बाब लक्षात घेणे नितांत गरजेचे ठरते.

**तोडगा की तडजोड** : त्यामुळेच वाढत्या कामाच्या संदर्भातील चर्चा-सूचना विविध संदर्भात येतात व त्यावर विविध दृष्टिकोनातून चर्चा होते. वेगवेगळे दृष्टिकोन मांडले जातात. मात्र, त्यावर तोडगा असा निघू शकत नाही. यातून आपापल्या प्रकारे तडजोड करून कर्मचारी-कंपन्या आणि त्यांचे कामकाज चालू ठेवण्याची तडजोड साधली जाते, हे वास्तव आहे. त्यामुळे मूळ प्रश्नावर विचार करून संबंधित उद्योग-व्यवसायासाठी गरजेची पूर्तता करण्यासाठी कर्मचारी त्यांचे कामकाज व कामाचे तास यांची निश्चिती गरजेची ठरते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### परीक्षेविना शिक्षण संकल्पना चुकीची

'परीक्षा समजा नसल्याच तर असे काय बिघडणार आहे?' या डॉ. विजय पांढरीपांडे यांनी आपल्या लेखात परीक्षेचे स्वरूप, परीक्षा यंत्रणा, विद्यार्थ्यांची मानसिकता आणि परीक्षेची निरर्थकता यावर भाष्य केले आहे. परीक्षेत होणारे गैरप्रकार, परीक्षेचा अनाठायी खर्च यावर सडेतोड भाष्य करताना त्यांनी परीक्षा घेण्यापेक्षा सदरील विद्यार्थ्याने या कालावधीत अभ्यासक्रमाचे अध्ययन केले म्हणून प्रमाणपत्र देण्याचे सुचवले आहे. परीक्षा न घेण्याचा सल्ला देताना त्यांनी हा प्रयोग करून बघायला काय हरकत आहे? असा सल्ला दिला आहे. खरे तर पहिली ते आठवी इयत्तेच्या जेव्हा परीक्षेचे स्वरूप बदलण्यात आले तेच मुळात चुकीचे व धोकादायक ठरले आहे. आता यापुढे कोणत्याही परीक्षा होणार नाहीत असे विद्यार्थ्यांना सांगितले की, विद्यार्थी अध्ययन करणार नाहीत, अभ्यास करणार नाहीत. शिक्षण म्हणजे केवळ वर्गात जाऊन बसणे, खेळणे, मौजमजा करणे अशी मानसिकता वाढीस लागेल. परीक्षेविना शिक्षण कुचकामी होणार आहे. परीक्षेमुळे बहुतांश विद्यार्थी शिक्षण प्रवाहात टिकून आहेत. परीक्षाच नाही तर विद्यार्थी उनाड होतील, शिक्षणाला क्षुल्लक समजले जाईल. परीक्षेविना शिक्षण आणले तर शिक्षकांविना शिक्षण यायला वेळ लागणार नाही. अशा शिक्षणामुळे विद्यार्थी यंत्रांसारखे निर्जीव होतील, त्यांच्याकडे कोणत्याही भावना उरणार नाहीत. परीक्षेविना शिक्षण ही संकल्पना चुकीची ठरणार आहे. परीक्षा झाल्याच पाहिजेत. परीक्षा घेणारी सक्षम यंत्रणा कार्यान्वित करण्याची खरी गरज संस्कार व नीतिमूल्ये शिकवण्याची नितांत गरज आहे; ज्यामुळे परीक्षेत गैरप्रकार होणार नाहीत. आणि म्हणून, काही जुजबी कारणांसाठी परीक्षेविना शिक्षण हे कुचकामी ठरणार आहे.

**बबन गुळवे**/९५४५४४२६४८

●● ●●

### ईपीएफ पेन्शनधारकांची सद्य:स्थिती

ईपीएफ पेन्शनधारकांच्या पगारातून कपात केलेल्या रकमेतून निवृत्तांना पेन्शन मिळते. अनेकदा आंदोलने करूनही त्यांत वाढ नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार योग्य कार्यवाही करून पेन्शन वाढविली जात नाही. टोलवाटोलवी सुरू आहे. पेन्शनधारकांना मिळणारी पेन्शन तुलनेने तुटपुंजी आहे. वाढती महागाई आणि जीवनशैली खर्च पाहता ही पेन्शन त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अपुरी पडते. कमी पेन्शनमुळे अनेकांचे जीवनमान खालावले आहे. दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठीही कधी कधी संघर्ष करावा लागतो. निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षा ही प्रत्येक व्यक्तीची अपेक्षा असते. मात्र, तुटपुंज्या पेन्शनमुळे अनेकांना ही सुरक्षा मिळत नाही. वैद्यकीय खर्च, दैनंदिन गरजा, घरखर्च इत्यादीसाठी पैसे पुरवणे कठीण होऊन बसते. आर्थिक अडचणींमुळे अनेक पेन्शनधारकांना मानसिक ताण येतो. पेन्शनची रक्कम वाढवून ती महागाईच्या प्रमाणात असावी. योजनेत सुधारणा, ईपीएफ पेन्शन योजनेत काही सुधारणा करून पेन्शनधारकांना अधिक लाभ मिळू शकतो. सरकारचा पाठिंबा, सरकारने पेन्शनधारकांच्या समस्यांकडे लक्ष देऊन त्यांच्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मायबाप सरकारला नम्र विनंती आहे.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

●● ●●

### सर्व सरकारी योजनांचा लाभ गरजूंनाच मिळावा

विधानसभा निवडणुकीत महायुतीला एकहाती सत्ता मिळण्यासाठी मतदार आकर्षित व्हावेत म्हणून सरकार पक्षाने विविध योजना आणल्या. लाडकी बहीण योजना ही त्यातीलच एक योजना. यापूर्वी मध्यप्रदेश शासनाने 'लाडली बहीण' नावाने ही योजना सुरू केली होती. याचाच परिणाम म्हणून विधानसभा निवडणुकीत भाजपाने घवघवीत यश मिळवीत शिवराजसिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या आश्वासनावर विश्वास ठेवत भरभरून मते देत महायुतीला परत सत्तेवर बसवले. आज महाराष्ट्रातच काय संपूर्ण देशात, राज्यात निवडणूक आली की, मतदारांना फुकट देण्यासाठी सर्व राजकीय पक्षांची चढाओढ लागलेली दिसते. खरे पाहिले असता सरकारच्या या फुकट धोरणाचा सर्वांनीच विरोध करायला हवा. ज्या कुटुंबाला जशी गरज आहे ती मदत केली तर त्याला कोणाचकडून विरोध होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही तसेच कुठलीही मदत देण्यासाठी त्याचे काही निकषही ठरवायला हवे. सरकारने तरुण असलेल्या कोणत्याही व्यक्तीला ती मग महिला असो वा पुरुष, यांना मदत करायची असेल तर त्यांचेकडून त्या बदल्यात काम करून घेतले पाहिजे. तरच सरकारी लाभ घेता येईल हा नियम असायला हवा. फुकट काही देणे योग्य नाही. सरकारच्या जनहितार्थ अनेक योजना अशा आहेत की, ज्यांची माहिती सर्वसामान्यांना माहीत नाही. त्यांचेपर्यंत पोहोचत नाही असे म्हणण्यापेक्षा पोहोचविल्याच जात नाही, असाही अनुभव आहे. अशा योजनांची माहिती समाजातील विविध घटकांतील व्यक्तींपर्यंत पोहोचवून त्या योजनांचा कसा लाभ मिळेल, अशी व्यवस्था लाभगृहीत व्यक्तींकडून करायला हवी. तरच खऱ्या अर्थाने त्याचा फायदा समाजातील विविध घटकांना मिळेल.

**रवींद्र गोविंद पांडे**/९३२५४५७०५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त

### आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली मनोज दादा जरांगे पाटलांची भेट

**मराठा आरक्षणाबाबतच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याची शासनाकडे विनंती**




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी २५ जानेवारी रोजी उपोषण सुरू केले आहे. त्याठिकाणी जाऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी रविवारी (दि.२६) रोजी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तसेच जरांगे पाटलांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याची शासनाकडे विनंती केली आहे.

२५ जानेवारी पासून अंतरवली सराटी येथे मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या बाबतीत सगेसोयरे अंमलबजावणी, हैद्राबाद गॅझेट करण्याची मागणी घेऊन आंदोलन सुरू केले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांचे हे सातवे उपोषण आहे. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी अंतरवली सराटी येथील उपोषणस्थळी जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तसेच त्यांना तब्येतीची काळजी घेण्याची विनंती केली. यासोबतच आ.क्षीरसागर यांनी जरांगे पाटलांच्या मागण्या तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या अनेक दिवसांपासून मराठा समाजाच्या आरक्षणाबाबतच्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार होत असलेले उपोषणामुळे त्यांची प्रकृती त्यांना साथ देत नाही. सद्यस्थितीलाही त्यांची प्रकृती खालावलेली आहे. त्यामुळे शासनाने त्यांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य कराव्यात. अशी विनंती आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनाकडे केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.


### राष्ट्रवादी भवनात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

भारतीय प्रजासत्ताक दिना निमित्त आज राष्ट्रवादी भवन बार्शी रोड बीड येथे सकाळी ८ वाजता उत्साह पुर्ण वातावरणात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.आ.संदिप भैया क्षिरसागर,माजी आ.सय्यद सलीम,माजी आ. उषाताई दराडे, यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नुतन जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यात आली.तर देशाचे थोर महापुरुष राष्ट्रपिता महात्मा गांधी,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या राष्ट्रीय कार्यक्रमास जेष्ठ नेते डि.बी. बागल, जिल्हा उपाध्यक्ष झुंजार धांडे, युवती जिल्हाध्यक्ष विद्याताई जाधव, बीड ता.अध्यक्ष बाळासाहेब गोरे, बीड शहराध्यक्ष खुर्शीद आलम, प्रदेश संघटक कुंदन काळे,मोमीन गुड्डु, महीला कार्याध्यक्षा रहेणाताई पठाण, ओबीसी सेल ता.अध्यक्ष सचिन दुधाळ, माजी नगरसेवक जलील पठाण, मधुकरराव डाके, बाळासाहेब राऊत, सुरेखाताई नवले, राणीताई शेख, मीनाक्षीताई देवकते, मंगलताई जगताप, परवेझ देशमुख आदी मान्यवरांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक, माजी नगरसेवक, कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

### मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत अप्पर जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

यावेळी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार चंद्रकांत शेळके, निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे,नायब तहसीलदार सुरेंद्र डोके यांच्यासह तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




# विकसित जिल्हा अशी बीडची ओळख घडवू-क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

बीड जिल्ह्यात अधिकाधिक सर्वांगीण विकास कामे करून विकसित बीड जिल्हा अशी ओळख प्राप्त करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज येथे केले.

पोलीस मुख्यालय मैदानावर ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा श्री भरणे यांच्या हस्ते पार पडला त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत तसेच जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या दिमागदार सोहळ्यात पोलिसदलासह होमगार्ड, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड आदींच्या १९ पथकांनी संचलन केले. या परेडचे नेतृत्व बीडचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी केले. ध्वजारोहणा नंतर भरणे यांनी परेडची पाहणी केली. आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात बलिदान देणारे स्वातंत्र्य सैनिक आणि सीमेवर शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.

देशाला पाचवी अर्थसत्ता बनविल्याबद्दल प्रधानमंत्र्याचे त्यांनी आभार मानले. राज्यात ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेला नेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी संकल्प केला आहे. त्याबद्दल त्यांचे व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे त्यांनी आभार व्यक्त केले. आद्यकवी मुकुंदराज यांच्या जिल्ह्यात ध्वजारोहण करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य समजतो असे श्री भरणे यावेळी म्हणाले.

खोखो विश्वचषक जिंकून देणारे बीडची कन्या प्रियंका इंगळे तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उंचावणारे बीडचे अविनाश साबळे तसेच राहुल आवारे आणि नवनाथ फरताडे यांचे त्यांनी आपल्या भाषणात कौतुक केले.

बीड जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रयत्नामुळे साकार होत आहे. यामुळे बाजारपेठ जवळ होऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यासह सर्वांनाच फायदा होणार आहे असे सांगणे श्री भरणे यांनी सेंद्रिय शेती तसेच रेशीम शेतीत जिल्हाला प्रथम क्रमांकावर आणल्याबद्दल शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.

जिल्हयात क्रीडा सुविधासाठी ८ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले असून माजलगाव, वडवणी, गेवराई, केज, अंबाजोगाई आणि धारूर या ६ ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारण्यात येईल, असेही क्रीडामंत्री यावेळी म्हणाले.जिल्ह्यात होणाऱ्या रस्त्यांच्या कामासाठी ९०० कोटीहून अधिक खर्च करण्यात येत आहे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीसह इतर ५१









कामासाठी ३२१ कोटी ५० लाखांचे कामे प्रगतीपथावर आहेत याचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. कार्यक्रमानंतर जिजाऊ मल्टीस्टेट गुन्हयाचा तपास लावणारे पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर मुरकुटे व तुळशीराम जगताप यांचा सन्मान करण्यात आला तसेच मंत्री महोदयांचे हस्ते शहीद जवान पांडुरंग वामन तावरे यांच्या वीर पत्नी गोदावरी तावरे यांना ताम्रपट प्रदान करण्यात आला. यावेळी शाळांच्या पथकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस दलाचे अनिल शेळके यांनी केले.

## माजलगाव नगरपालिकेच्या वाढीव मालमत्ता करा बाबत नागरिकांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन उपाययोजना करा-मोहनराव जगताप

**घरपट्टी नळपट्टी बाबत तक्रार असल्यास फेर सर्वे करू -मुख्याधिकारी चव्हाण**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ जानेवारी**

माजलगाव शहरातील अनेक नागरिकांच्या घरपट्टी नळपट्टीच्याबाबत तक्रारी होत्या पाईपलाईन नसताना सुद्धा नळपट्टी तसेच कमर्शियल इंडस्ट्रियल झोन तसेच वित्तीय टॅक्स याबाबत नागरिकांच्या मनामध्ये संभ्रम होता. कोर प्रोजेक्ट अमरावती एजन्सी मार्फत हे काम केले होते त्यांच्या सर्वेनुसार जास्तीचे बिल आल्यामुळे व प्रत्यक्ष नागरिकांच्या घराचे मोजमापा बाबत अनेक तक्रारी होत्या. यासाठी राष्ट्रवादी



काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते मोहनराव जगताप यांनी २६ जानेवारी रोजी नगरपालिकेमध्ये मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण व नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे उपस्थितीत नागरिकांसाठी जनता दरबार भरवला व शहरातील नागरिकांच्या तक्रारींचा पाढा मुख्याधिकाऱ्यासमोर वाचला. तसेच शहरांमध्ये अनेक पोलवर लाईट नसून घाणीचे साम्राज्य आहे नगरपालिकेमध्ये नागरिकांना अनेक अडचणी येत असल्याच्या तक्रारी होत्या. या सर्वांची दखल घेऊन मुख्याधिकारी चव्हाण यांना सांगून ज्या कोर प्रोजेक्ट अमरावती यांनी हा सर्वे केला त्या कंपनीच्या कर्मचाऱ्याला पूर्ण वेळ नगरपालिकेमध्ये बसून नागरिकांच्या वाढीव मालमत्ता बाबत व नळपट्टी बाबत तक्रारीची दखल घेऊन तात्काळ सर्वे करून वस्तुनिष्ठ अहवाल मागून त्यानुसार घरपट्टी व नळपट्टी दुरुस्त करून देण्यात यावी व शहरात आठ दिवसात पोलवरील लाईट बसवण्यात याव्यात याबाबत सूचना केल्या. तसेच मुख्याधिकाऱ्यांनी या मागण्याबाबत सकारात्मकता दर्शवून लवकरात लवकर वाढीव घरपट्टी बाबत तक्रारीची दाखल घेऊन नागरिकांच्या समाधान करण्याचे आश्वासन दिले. या जनता दरबारास प्रदेश सरचिटणीस दयानंद स्वामी, विधानसभा अध्यक्ष नारायण डक, माजी नगराध्यक्ष साहल चाऊस, माजी सभापती नितीन नाईकनवरे, माजी नगराध्यक्ष नासेर पठाण, संतोष यादव, कचरू खळगे, मज्जिद भाई, सुरेश एरंडे, नगरसेवक सुशील लोढा, विनायक रत्नपारखी, ईश्वर होके, सय्यद भाई, इमरान भाई, मनोज फरके, डॉ. श्रीराम खळगे, शकील कुरेशी, रशीद भाई,लतीफ भाई, फिरोज इनामदार, दीपक देशमुख, इरफान मिर्झा उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी अनेक समस्या मांडल्या तसेच शहराच्या विकासासाठी आम्ही नगरपालिकेच्या सोबत आहोत परंतु मुख्याधिकारी साहेबांनी आम्हाला मूलभूत सुविधांसाठी नगरपालिकेकडून सहकार्य करावे व नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना पूर्ण वेळ नागरिकांच्या कामासाठी उपलब्ध राहण्याच्या सूचना द्याव्यात असे सांगितले. जनता दरबारासाठी व वाढीव घरपट्टी मालमत्ता कराबाबत माजी नगरसेवक शरद यादव यांनी पुढाकार घेऊन सर्व नागरिकांना एकत्रित करून प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल शहरातील नागरिकांच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

## यशवंत पब्लिक स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात

**शहीद झालेल्या व सध्या कर्तव्यात असलेल्या सैनिकांना व त्यांच्या कुंटुबियाना मोफत नेत्र उपचार देणार-डॉ स्वानंद कुलकर्णी**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ जानेवारी**

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त यशवंत पब्लिक स्कूलमध्ये माजलगाव येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ स्वानंद कुलकर्णी साहेब, श्रीकृष्ण सेठ शेजुळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी या कार्यक्रमास उपस्थित यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे निरंजन सर वाघमारे निखिल सर वाघमारे , विनायक रत्नपारखी व शिक्षक, कर्मचारी वृंद . या ध्वजारोहण प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा मध्ये विविध देशभक्तीपर गाण्यावर नृत्य सादर केले , याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉक्टर स्वानंद कुलकर्णी म्हणाले देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी प्राणाची आहुती दिली , त्यांनी दिलेले बलिदान केलेला त्याग व समर्पण , हे आपण कधीही विसरू नये , व त्यामुळे १५ ऑगस्ट असो अथवा २६ जानेवारी



असो अशा या राष्ट्रीय उत्सवानिमित्त , शहीद झालेल्या क्रांतीकारकांचे , स्मरण करणे व त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे आपले कर्तव्य आहे., आपण प्रत्येक जण जरी सीमेवर जाऊन संरक्षण करू शकत नसलो तरी आपण ज्या क्षेत्रात काम करू त्या क्षेत्राच्या माध्यमातून सर्वांसाठी सहकार्य ,सेवा कार्य करून आपले कर्तव्य पार पाडली पाहिजेत असे सांगून सखोल असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉक्टर स्वानंद कुलकर्णी साहेब यांनी या ठिकाणी *एक संकल्प केला आज पासून जे कोणी माझ्याकडे शहीद झालेल्या व आजी-माजी सैनिकांच्या कुटुंबातील व्यक्ती येतील अशा व्यक्तींना मी डोळ्याचे उपचार मोफत देणार आहे* डॉक्टर स्वानंद कुलकर्णी साहेब यांनी केलेल्या आज या संकल्पामुळे डॉ स्वानंद कुलकर्णी यांचे शाळेच्या वतीने अध्यक्ष श्री निरंजन सर वाघमारे ,निखिल सर वाघमारे व संचालक विनायक रत्नपारखी यांनी अभिनंदन व कौतुक करून सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डोना मॅडम , आगजाळ मॅडम यांनी केले तर प्रास्ताविक निरंजन वाघमारे यांनी केले .

# तहसील कार्यालय बीड येथे आपले सरकार केंद्रचालक व सेतू चालक यांची बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

तहसील कार्यालय बीड येथे ग्रीस्टॅक योजनेच्या अंमलबजावणी बाबत व राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या सूचनांचे अंमलबजावणी साठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या सूचनेनुसार २६ जानेवारी रविवार रोजी ध्वजारोहणच्या कार्यक्रमाननंतर बैठक संपन्न झाली.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील सर्व आपले सरकार केंद्र चालक अथवा सेतू केंद्र चालक यांनी जनतेची कामे तात्काळ करावी , कोणीही सर्वसामान्य लोकांची अडवणूक करू नये , अशा स्वरूपाच्या सूचना दिल्या आहेत . त्याला अनुषंगून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सेतू केंद्रचालक अथवा आपले सरकार केंद्रचालक यांच्यामार्फत देण्यात येत असलेल्या सुविधांची वेळोवेळी तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी पाहणी करावी असा अशा सूचना दिल्या आहेत . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या सूचनेनुसार या बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले.

राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात १५ जानेवारी रोजी बैठक घेतली होती . या बैठकीत माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात झपाटयाने बदल झालेला आहे . हा बदल पाहता आपल्या कामाचा निपटारा लवकर होण्याच्या दृष्टीने व शासकीय कामात पारदर्शकता यावी यासाठी तंत्रज्ञानाचा अधिक वापर करुन नागरिकांनी ऑनलाईन अर्ज भरावेत असे आवाहन केले होते . यावेळी त्यांनी सेतू सुविधा केंद्रास भेटही दिली होती . त्यावेळी डॉक्टर जाधव यांनी सेतू केंद्रामध्ये नागरिकांना ऑनलाइन तक्रार व अपील दाखल करण्याची सुविधा उपलब्ध असल्याबाबत सर्वांनी सूचनाफलक लावावा अशा सूचना दिल्या होत्या.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग :

महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा क्रांतीकारी कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम , २०१५ . या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पादरर्शक , गतिमान व कालबध्द सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे . या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याकरीता महाराष्ट्र सेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली . दिनांक १ मार्च, २०१७ रोजी राज्याचे माजी मुख्य सचिव , स्वाधीन क्षत्रिय यांची राज्याचे पहिले राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली . दि.०४. ०५ . २०२३ रोजी पासून राज्याचे माजी मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव , भा.प्र.से. (से.नि.) यांनी मुख्य



आयुक्त , राज्य सेवा हक्क आयोग म्हणून कार्यभार स्विकारला आहे .

या कायद्याअंतर्गत कोणत्या सेवा नागरिकांना प्राप्त करून घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे , ही माहिती आपण आर.टी.एस. महाराष्ट्र या मोबाईल प वर किंवा आपले सरकार वेब पोर्टल वर पाहू शकता . सेवा प्रदान करताना विलंब झाल्यास किंवा संयुक्तिक कारण नसताना सेवा नामंजूर करण्यात आली तर नागरिक प्रथम/ द्वितीय अपील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व तिसरे आणि शेवटचे अपील आयोगाकडे दाखल करू शकतात.

ग्रीस्टॅक काय आहे : भारत सरकार ग्रीस्टॅक ही संकल्पना देशात राबवीत आहे . या संकल्पनेअंतर्गत देशातील शेतकऱ्यांचे पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत . शेतकऱ्यांना ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र देण्यात येणार आहे . हे शेतकरी ओळखपत्र शेतकऱ्यांसाठी त्यांच्या शेतीविषयक आणि शासकीय कामासाठी वापरता येणार आहे . शेतकरी ओळखपत्र हे ऑनलाईन स्वरूपाचे असणार आहे . या ओळखपत्रासाठी शेतकऱ्याला ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे . शासनाच्या अग्रीस्टॅक वेबसाईट वरती जावून शेतकऱ्याला स्वतः ची आणि आपल्या शेतीची पूर्ण माहिती भरावी लागणार आहे . या ऑनलाईन प्रोसेस मध्ये आधार कार्ड सातबारा आणि होल्डिंगशी जोडले जाणार आहे.

विशेष म्हणजे २६ जानेवारीच्या मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमानंतर क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते बीड तालुक्यातील बहादरपूर येथील लताबाई कोळेकर व कविता गोयकर यांना ग्रीस्टॅक अंतर्गत उत्कृष्ट सहभाग नोंदवला म्हणून सन्मानपत्र देण्यात आले.

ग्रीस्टॅक प्रकल्पाचे अंमलबजावणीचे अनुषंगाने तहसिल कार्यालय बीड अंतर्गत येणारे आपले सरकार केंद्रचालक व सेतू चालक यांची सकाळी १० वाजता ग्रीस्टॅक प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे अनुषंगाने तहसील कार्यालय बीड येथे बैठक संपन्न झाली . सर्व उपस्थित आपले सरकार केंद्रचालक यांना ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी माहिती संच निर्मिती बाबत सर्व तालुक्यात कॅम्पचे नियोजन करणे , त्यामध्ये गावातील मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , कृषी सहाय्यक , ग्रामसेवक यांचा सहभाग असावा अशा सूचना नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी दिल्या . शासनाने ठरविलेल्या नियोजनानुसार सर्व काम वेळेत पुंर्ण करणेबाबत इत्यादी संदर्भामध्ये कॅम्पचे आयोजन करावे असे आवाहन त्यांनी केले . तसेच सर्वांनी शेतक-यांसाठी सेवाभाव वृत्तीने काम करणेबाबत सर्वांनी जनतेची कामे विहित वेळेत पार पाडली पाहिजेत असे सांगितले . सदरील बैठकीत सर्वांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच या ग्रीस्टॅक कामकाजाच्या अनुषंगाने तालुकास्तरीय मास्ट्रर ट्रेनर यांचे ही मोबाइल क्रमांक देण्यात आले.

यावेळी तहसील कार्यालयांतर्गत संजय गांधी निराधार योजना , श्रावण बाळ योजना यासंदर्भात देखील सर्वांना माहिती देण्यात आली . तहसीलदार चंद्रकांत शेळके हे नागरिकांकडून कोणीही अतिरिक्त शुल्क येऊ नये , यासाठी आग्रही असतात , तशा सूचना यावेळी देण्यात आल्या . तसेच सेवाहमी कायद्यांतर्गत अपील करणा-या तरतुदीचे बॅनर लावणेबाबत देखील सूचना देण्यात आल्या . ग्रीस्टॅक प्रकल्पाचे अनुषंगाने सर्व गावनिहाय आम्ही भेटी देणार असून सदरील काम विहित वेळेत पाडण्यासाठी सर्वांनी उत्साह दाखवावा असे आवाहन नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी केले . या बैठकीस सी एस सी चे जिल्हा मॅनेजर दिनेश जाधव हे देखील उपस्थित होते . त्यांनी देखील ग्रीस्टॅक अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शन केले . तसेच तालुकास्तरीय मास्ट्रर ट्रेनर यांनी ही याबाबत मार्गदर्शन केले.

सदर बैठकीस प्रशांत जाधवर , नायब तहसीलदार , दिनेश जाधव सी एस सी चे जिल्हा मॅनेजर , राहुल कसबे , सहायक महसूल अधिकारी , कृष्णा रत्नपारखी ग्राम महसूल अधिकारी , सरोजिनी बोराडे , महसूल सहायक , राजाभाऊ गवळी , सेतुचालक पिंपळनेर , सतिश जाधव , विजय क्षिरसागर , विलास वरेकर , श्रीकांत पंडीत , सेतुचालक बीड व बीड तालुक्यातील सेतूचालक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### इंदिरा गांधी नर्सिंग स्कूलची मान्यता रद्द करा- वंचित बहूजन आघाडीची मागणी, प्रशासनास निवेदन सादर

**परभणी,/प्रतिनिधी :** विद्यार्थीनींकडून परिक्षा शुल्क वसूल करुन देखील त्यांना परिक्षेपासून वंचित ठेवल्याबद्दल इंदिरा गांधी नर्सिंग स्कूलची मान्यता रद्द करुन कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तुषार गायकवाड यांच्यासह परिक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थीनींनी सोमवार २७ जानेवारी रोजी जिल्हा प्रशासनास एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, येथील इंदिरा गांधी नर्सिंग स्कूलच्या वतीने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात 'जीएनएम' या शाखेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थीनींकडून प्रती वर्ष २५ हजार रुपये प्रमाणे बेकायदेशीर फिस वसूल करण्यात आली. त्याचबरोबर या शैक्षणिक वर्षात परिक्षेच्या नावाखाली २ हजार रुपये जादा वसूल केल्या गेले. कहर म्हणजे शुल्क भरुनही या विद्यार्थीना परिक्षेपासून वंचित ठेवल्या गेले आहे. परिणामी या विद्यार्थीनींचे एक वर्ष वाया जाणार असून त्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान झाले आहे, असे या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून देत सदरील हे कॉलेज असक्षम असल्याचा आरोप केला.

विद्यार्थीनींच्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानाची संस्थेने किंवा बोर्डाने भरपाई करुन द्यावी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेपासून सदरील विद्यार्थीनींना वंचित रहावे लागणार असल्यामुळे त्याचीही भरपाई द्यावी, विद्यार्थीनींची वार्षिक फिस परत देण्याबाबत कारवाई करावी, विद्यार्थीनींची फसवणूक केल्याबद्दल व निष्काळजीपणाबाबत संस्थाध्यक्षांसह सदस्य व प्राचार्यांवर गुन्हा दाखल करावा, या संस्थेची मान्यता रद्द करुन संस्था व कॉलेजला काळ्या यादीत टाकावे आदी मागण्या जिल्हा प्रशासनास सादर केलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या असून मागण्या मान्य न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करुन न्यायालयात दाद मागितली जाईल, असा इशारा दिला आहे.

### कांतराव देशमुख यांना 'जीवन साधना गौरव' पुरस्कार जाहीर

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त २०२३-२४ या वर्षासाठीचा पुरस्कार वितरण समारंभ दि. ३० जानेवारी रोजी दोन सत्रामध्ये आयोजित करण्यात आलेला असून या वर्षीचा जीवन साधना गौरव पुरस्कार कृषीभूषण कांतराव देशमुख झरीकर यांना जाहीर झाला आहे.

या पुरस्काराचे वितरण ३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्याच्या सहकार विभागाचे कॅबिनेट मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे असणार आहेत, असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांनी कळविले आहे. कांतराव काका झरीकर यांना महाराष्ट्र शासनाने कृषी-भूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांनी कृषी, जलसंधारण, कृषीपूरक उद्योग क्षेत्रात विविध प्रयोग करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. तसेच त्यांनी सामाजिक, जांभुळभेट संवर्धन, एक गाव-एक स्वच्छ सुंदर स्मशानभूमी चळवळीची पायाभरणीकरित सामाजिक योगदान दिलेले आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन विद्यापीठाने त्यांना जीवनसाधना गौरव पुरस्कार २०२३-२४ देण्याचे जाहीर केले आहे. असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे.

### डॉ. नितोंडे यांना विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार जाहीर

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रोहिदास नितोंडे यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता देण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे वितरण ३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्याच्या सहकार विभागाचे कॅबिनेट मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे असणार आहेत. असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे.

डॉ. नितोंडे मागील अनेक वर्षापासून श्री शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ते विद्यापीठाच्या इंग्रजी विषयाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्षही आहेत. मागील एक वर्षापासून ते महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदाची धुरा सांभाळत आहेत. उपक्रमशील,विद्यार्थीप्रिय, संशोधकवृत्ती असलेले डॉ. नितोंडे यांनी संशोधन क्षेत्रात आपले महत्वाचे योगदान दिले आहे. या कार्याची दखल घेत विद्यापीठाने सदरील पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे. त्यांना जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशराव सोळुंके, सरचिटणीस आ.सतीशराव चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य इंजि.नारायण चौधरी, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी, इंग्रजी विभागप्रमुख डॉ.विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे आदींनी अभिनंदन केले.

### लायन्स क्लब'द्वारे ३ फेब्रुवारीला मोफत जयपूर फुट शिबीर

**परभणी,/प्रतिनिधी :** लायन्स क्लब पुणे सुप्रिम, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी व लायन्स क्लब परभणी मेन यांच्या संयुक्त विद्यमाने ३ फेब्रुवारी रोजी परभणीत दिव्यांग बांधवांसाठी मोफत कृत्रिम पायरोपण (जयपुर फुट) पोलिओ कॅलिपर्स शिबीर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती लायन्स क्लब परभणी मेनचे अध्यक्ष ला. अरुण (अवि) टाक यांनी दिली. येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केलेल्या या शिबीरात ३ फबुवारी रोजी मोजमाप घेण्यात येणार असून ४ व ५ फेब्रुवारी रोजी साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# जिंतूर शहरातील विविध समस्या तात्काळ सोडवा अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करणार- माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब भांबळे

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी-:** शहरातील नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत असल्याने नागरीक त्रस्त झाले आहेत. त्या समस्या प्राधान्याने सोडवण्यात याव्यात या आशयाचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)गटाचे सर्व माजी नगरसेवक व पदाधिकारी यांच्याकडून मुख्याधिकारी नगरपरिषद जिंतूर यांना आज देण्यात आले. त्यात जिंतूर शहरात घाणीचे सामाज्य झाले असून गेली तीन महिन्यापासून नाल्या सफाई केल्या नाहीत. त्यामुळे नाल्यांवरील घाणपाणी रत्यावर येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये विविध गंभीर आजार होण्याची श्यक्यता नाकरता येत नाही, त्यासाठी जिंतूर शहरतील संपूर्ण नाल्या स्वच्छ करण्यात याव्यात. जिंतूर शहरात रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर कचरा साचत असून घंटा गाडी प्रभागात आठ-आठ दिवस येत नसल्याने ओला कचरा व सुका कचऱ्याचे ढीग मोठ्या प्रमाणावर साचत असून त्यामुळे शहरात दुर्गधी पसरत आहे. त्यासाठी घंटा गाडी दररोज प्रभागात येऊन कचरा उचलण्यात यावा व शहरात रस्त्यावर कचऱ्याचे ढीग तात्काळ उचलण्यात यावेत. मुख्य रत्यावरील व वस्तीमधील स्ट्रीट लाईट बंद पडले असून रात्री सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. महिला व नागरिक यांच्यामध्ये असुरक्षिततेची भीती निर्माण झाली असल्याने त्यासाठी रस्त्यावरील व वस्तीमधील स्ट्रीट लाईट तात्काळ सुरु करण्यात यावेत.जिंतूर शहरातील प्रभाग क्र.१० मधील नामदेव नगर व प्रभाग क्र.५ मधील जमादार गल्ली, जामा मज्जीद परिसर तसेच प्रभाग क्र. १० मधील आजम कॉलनी येथे जुनी वस्ती मोठ्या प्रमाणावर असून नागरिक मोठ्या प्रमाणावर स्थाईक आहेत. तसेच या भागाचे नवीन पाणी पुरवठा योजने अंतर्गत सदर इस्टीमेट मध्ये गुगलमॅप द्वारे सर्वे क्षण करून डी.पी. प्लॅन मध्ये काम समाविष्ट केलेले आहे. परंतु, आज पर्यंत सदर काम पूर्ण न झाल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे, जिंतूर शहरात दहा-दहा दिवस पाणी सुटत नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यासाठी शहरात नियमित पाणी पुरवठा करण्यात यावा. घरकुल योजने अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी घरकुल योजना व ईतर सर्व घरकुल योजनाच्या लाभार्थ्यांना बांधकाम पूर्ण झालेले असून देखील सहा-सहा महिने हप्ते टाकले जात नाहीत. त्यासाठी सर्व योजनेतील घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते तात्काळ टाकण्यात यावेत. ही सर्व कामे तात्काळ सोडवण्यात यावेत, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल व यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील असे नमूद करण्यात आले आहे.

यावेळी माजी उप नगराध्यक्ष बाळासाहेब भांबळे, माजी नगरसेवक शाहेदबेग मिर्झा, मनोहर डोईफोडे,दलमीर पठाण, संजय निकाळजे, दत्तराव काळे, शेख इस्माईल,शोएब जाणिमिया, शौकत लाला, अक्कू लाला, इत्यादीची उपस्थिती होती.



# पूर्णेत बालकांवर वाचा दोष निर्मुलन शिबीरात २० बालकांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत १८ वर्षांखालील वयोगटातील वाचा दोष( टंग टाई) असलेल्या बालकांवर तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थित मोफत वाचा दोष निर्मुलन शस्त्रक्रियेचे शिबिर २८ मंगळवार रोजी येथिल ग्रामीण रुग्णालयात संपन्न झाले.यावेळी तालुक्यातील सुमारे २० बालकांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण नाईक यांनी दिली आहे.

पूर्णा ग्रामीण रुग्णालयात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत मंगळवारी सकाळी वाचा दोष(टंग टाईप) आजार निर्मुलन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी टंग टाई तज्ञ डॉ. तेजस तांबोळे,डॉ.विनोद अर्जुन,डॉ. लक्ष्मण नाईक,गट शिक्षणाधिकारी बालाजी कापसीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.प्रसंगी डॉ.रेखा चव्हाण,डॉ.नागेश देशमुख,डॉ. कानडकर,डॉ.ऋषिकेश ठाकूर,विस्तार अधिकारी नेटके आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना वैद्यकीय अधीक्षक डॉ.नाईक म्हणाले की येथील ग्रामीण रुग्णालयात अधून मधून वाचा दोष निर्मूलन शिबिराचे आयोजन करण्यात येते. शिबीरात शून्य ते अठरा वयोगटातील श वाचादोष असलेल्या मुलांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येते.नुकतेच शिक्षण विभागाच्या सोबतीने शोध मोहीम घेण्यात आली होती .यामध्ये वाचा दोष असलेल्या २० बालकं मआढळून आले त्या सर्वांवर तज्ञ डॉक्टरांच्या हस्ते शिबिरात वाचा दोष निर्मूलन शस्त्रक्रिया करण्यात आल्या.यापुढेही वाचा दोष असलेल्या बालकांचे मोफत शस्त्रक्रिया करण्यासाठी शहरासह तालुक्यातील नागरिकांनी रुग्णालयाशी संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी आरोग्य विभागाचे अब्दुल वहीत फारुकी,महेंद्र मकरंद,बापूराव कदम,सिंड्रेला झांबरे,दीपिका चव्हाण,नंदा भिसे,शिक्षण विभागाचे नागनाथ जाधव,संदेश भरणे, व्यंकटरमन जाधव,योगेश देशमुख,बाबा सुरकुटे,अनिल मंगनाळे,बालाजी सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.




### ३२०२ रोहिंग्यांना परभणीतून जन्म प्रमाणपत्र..! किरीट सोमय्या यांनी महसूल प्रशासनास धरले धारेवर

**चारठाणा,/प्रतिनिधी-** परभणी सारख्या तालुक्यातून ३ हजार २०२ बांगलादेशीय रोहिंग्यांना प्रशासनाद्वारे जन्म प्रमाणपत्र वितरीत झाले असून ही बाब अत्यंत गंभीर आहे, असे मत भारतीय जनता पार्टीचे नेते माजी खासदार किरिट सोमय्या यांनी परभणीत एका बैठकीतून व्यक्त केले. या जन्म प्रमाणपत्र घोटाळ्यातील संबंधितांविरुध्द कठोर कारवाई तर होईलच परंतु, या देशविरोधी षडयंत्राची अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेतली पाहिजे, भविष्यात या पध्दतीची बनावट प्रमाणपत्रे वितरित होणार नाहीत, याची खबरदारी घेतली पाहिजे, असा इशारा दिला.

भाजपाचे नेते सोमय्या हे मंगळवार २८ जानेवारी रोजी दुपारी सुरक्षा रक्षकांच्या ताफ्यानिशी जालन्याहून वाहनांद्वारे परभणीत दाखल झाले. लगेचच जिल्हाधिकारी कार्यालय गाठून सोमय्या यांनी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, तहसीलदार डॉ. राजापूरे यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांबरोबर संयुक्तपणे हितगुज केले. यातून सोमय्या यांनी परभणी सारख्या छोट्या विभागातूनच ७० वर्षांपूर्वी जन्मलेल्या व्यक्तींना प्रशासनाने गेल्या सहा महिन्यात हजारोनिशी जन्म प्रमाणपत्र वितरित केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. जन्म प्रमाणपत्र प्राप्त करणारे बहुतांशी रोहिंगे आहेत, बांगलादेशीय आहेत, असे नमूद करीत सोमय्या यांनी काहींनी केवळ आधार कार्डच्या आधारावर जन्म प्रमाणपत्र प्राप्त केले आहेत. तर काहींनी स्वस्त धान्य दुकानातील अस्पष्ट असणाऱ्या रेशन कार्डच्या प्रती देवून जन्म प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. हे प्रकार अत्यंत गंभीर असून थातूर मातूर पुराव्याच्या आधारे जन्म प्रमाणपत्र वितरित करणे म्हणजे एक प्रकारे देशद्रोहच आहे, असे सूनावले.

### संगीताच्या परिक्षेत लोखंडे, व मुळे तिघांचे विशेष प्राविण्यासह यश





**चारठाणा,/प्रतिनिधी-** अखिल भारतीय गांधर्व मंडळ, मुंबई मार्फत घेतल्या जाणाऱ्या ताबला,पखावज,व हार्मोनियम प्रवेशिका प्रथम व व्दितीय परिक्षेत संत जनार्दन विद्यालय,चारठाणा च्या मुलांनी यश प्राप्त केले, दहावी वर्गात असलेला विदयार्थी ऊदय ओमप्रकाश लोखंडे व इयत्ता नववी मध्ये असलेला विद्यार्थी केदार गोपाळ मुळे व बारावी मध्ये शिकत असलेली विद्यार्थीनी समृध्दी मुळे या तिघांनी विशेष प्राविण्यासह यश मिळवले आहे.

पखवाज व तबला, हार्मोनियम परीक्षेतही तिघे प्रथम गुणाने विशेष प्राविण्य श्रेणीत यश मिळवत जिंतूर तालुक्यातुन प्रथम क्रमांक पटकाविला आहे. दरम्यान विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक पालकांनी करत संगीत शिक्षन देनारे श्री ओमप्रकाश लोखंडे व ह.भ.प.मोहन महाराज सानप जांबरूनकर व गावातील भजनी मंडळीनी पूढील पारमार्थीक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.महाजन एस. आर, श्री.जाधव एन.एस, श्री.केदारी बी.एस,संगीत शिक्षक प्रा.नरवडे आर.जी, प्रा.कुलकर्णी डी.डी, प्रा.सूर्यवंशी व्ही. ए. व सर्व शिक्षक वृंदांसह समस्त चारठाणकर गावकरी भजनी मंडळींनी दोघांचे अभिनंदन केले आहे.



**परभणी- हजरत सय्यद शहा तुराबूल हक्क रहे यांचा दरवर्षी परभणी शहरातील दर्गा रोड येथे ऊर्स भरत असतो. यावेळी या ठिकाणच्या परिसराची पाहणी करताना जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, श्रीमती खा.डॉ.खान यांच्यासह अन्य पदाधिकारी दिसत आहेत.**

# सोनपेठ पोलिसांची स्वच्छता अभियान मोहिम जोमात सुरु



**प्रत्येक रविवारी कर्मचारीच करतात स्वच्छता**

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** नवीन वर्षे २०२५ च्या आरंभापासून सोनपेठचे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी मिळून पोलीस ठाणे परिसरातील स्वच्छता करत एक आगळा वेगळा उपक्रम राबवत आहेत. यावेळी २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

सोनपेठ पोलीस ठाण्याच्या हक्काची खुप मोठ्या प्रमाणात मोकळी जागा आहे.या जागेवर पुर्वीपासूनच वेड्या बाभळीसह इतर झुडपांनी दाटी केली होती.तसेच गाजर गवत व काटेरी झुडपांनी सर्व जागा व्यापून टाकली होती. यावेळी सोनपेठ पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांनी सन २०२५ या नव्या वर्षापासून एक नवीन संकल्प केला आहे. आठवड्यातून एक दिवस प्रत्येक रविवारी पोलीस स्टेशन हद्दीत सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सोबत स्वच्छता करायची. हा उपक्रम १ जानेवारी २०२५ राबविण्यात येत आहे. काल २६ जानेवारी रोजी या उपक्रमाचा वर्षातील चौथा रविवार होता. या दिवशी सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मिळून पोलीस स्टेशन इमारतीच्या मागच्या बाजूला असलेला कचरा गोळा करुन त्याची होळी केली. तसेच ठाण्याच्या चौबाजूच्या संरक्षण भिंतीवर व लगत वाढलेली झुडपे काढून टाकण्यात आली. नागरीकांच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असलेले सोनपेठ पोलीस आता स्वच्छता अभियान राबविण्यात सरसावले आहेत. हे अभियान पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड, सहायक पोलीस निरीक्षक चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक राजीव म्हात्रे, अजय किरकण, कांबळे यांच्यासह सर्व बीट जमादार व पोलीस कर्मचारी राबवताना दिसत आहेत.

# शाश्वत शेती, शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून परिवर्तन घडवूया : पालकमंत्री सावे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ जानेवारी**

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे झेंडावंदन आज राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण,दुग्धविकास,अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदान वजिराबाद नांदेड येथे झाले. यावेळी त्यांनी नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी शाश्वत शेती व शाश्वत ऊर्जेच्या सर्व प्रकल्पांना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचा संदेश यंत्रणांना दिला. आजचा प्रजासत्ताक दिन विविध विभागांचे लक्षवेधी सादरीकरण व चित्ररथांमुळे स्मरणीय ठरला.आज सकाळी ९.१५ वा. पालकमंत्री अतुल सावे यांनी ध्वजवंदन केले. त्यानंतर पोलीस वाहनातून त्यांनी संचलन करणाऱ्या पथकांचे निरीक्षण केले. आजच्या परेडचे नेतृत्व पोलीस उपअधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांनी केले.

यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद तिडके, विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,



मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, उपजिल्हाधिकारी निवासी महेश वडदकर, स्वातंत्र सैनिक, वरिष्ठ अधिकारी, वारसपत्नी आणि जेष्ठ सन्माननीय नागरिक, विविध पक्षांचे पदाधिकारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमामध्ये अनेक मान्यवरांना अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या उपलब्धीसाठी त्यांचा सत्कारही करण्यात आला.

यावेळी पालकमंत्र्यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी केंद्र व राज्य शासनाने शेती आणि अपारंपरिक ऊर्जेच्या स्त्रोतांना शाश्वत सुत्रामध्ये बांधण्याचे धोरण अधोरेखीत केले. जिल्ह्यातील सिंचन सुविधा आणखी बळकट करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही सांगितले. यावेळी त्यांनी किवळा साठवण तलाव पिण्याच्या पाण्यासाठी उपयोगात आणल्यास सिंचन क्षमता आणखी वाढेल. यासाठी तातडीने शहराच्या पाणीपुरवठ्यामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या सूचना केल्या.चित्ररथ ठरले लक्षवेधी

यावर्षी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी वेगवेगळ्या विभागांना मोठ्या प्रमाणात आपल्या उपलब्धीला चित्ररथाच्या स्वरूपात मांडण्याचे आवाहन केले होते त्याला प्रतिसाद देत अनेक विभागांनी आपले चित्ररथ तयार केले होते पालकमंत्र्यांनी या चित्ररथाचे निरीक्षण केले. महानगरपालिका, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, समाज कल्याण विभाग व क्रीडा विभागाचे चित्ररथ लक्षवेधी ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली नाथू, रविंद्र पांडागळे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त



### आश्रम शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा

**नायगांव**-तालुक्यातील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पोष्ट बेसिक ज्यू कॉलेज व माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत ७६वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. तालुक्यातील मरवाळी तांडा येथील ग्रामपंचायती सह माध्यमिक ,उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील प्राचार्य विजयकुमार देशमुख, नामदेव राठोड, कुसुम राठोड, ग्रामविकास अधिकारी नामदेव माने सरपंच डॉ. मधुकर राठोड ,पो.पा.दशरथ राठोड , सेवानिवृत्त माजी प्राचार्य किशनराव राठोड भारत बेटकर,श्रीराम राठोड,शेषेराव बोईवार,सेवानिवृत्त शिक्षक सिताराम जाधव,पवळे, परसराम राठोड, संभाजी पवार, प्रकाश चव्हाण, श्रीनिवास जाधव, अनिल जाधव, अजय राठोड, विजय आडे, पांडुरंग जाकोरे,यांच्या उप स्थितीमध्ये शाळेच्या भव्य पटांगणात सर्व प्रथम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन राठोड यांच्या हस्ते महात्मा गांधी व महामानव डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करून.ध्वजावंदन करण्यात आले. तद्नंतर पोष्ट बेसिक ज्यू. कॉ. मधील प्राध्यापक माधव वाघमारे यांच्या संचाने देशभक्तीपर गीत गायीले व त्यानंतर कॉलेज मधील पुजा लोहबंदे विद्यार्थ्यीनी ने एके काळी समाजातील स्त्रीला ही चूल आणि मूल एवढ्याच चौकडीत राहुन. जिवनाचा चारितार्थ भागवावा लागायचा तीच आजची महिला भारतीय संविधानामुळेच प्रतिभा ताई पाटील यांच्या रुपाने आज देशातील सर्वोच्च पदा वर विराजमान होण्याचा बहुमान मिळविला आहे. अशी भावना या वेळी आपल्या मनोगतातून व्यक्त केली आहे.या नंतर संस्थेच्या वतीने ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मरवाळी तांड्या सह यापंचक्रोशीतून आलेल्या पाहुणे मंडळी सर्व विद्यार्थ्यांसाठी गोड सुरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक ज्यू कॉ.पोष्ट बेसिक ज्यू.कॉ.चे सुर्यकांत जाधव, आनंदराव सुर्यवंशी, नागनाथ येल्लूरे, व्यंकट रेकुळवाड, पांडुरंग जाधव,नागोराव चव्हाण, एकनाथ मुनगीलवार, साहेबराव येवरे, सतिश हाणमंते, फेरोज शेख, काशीनाथ बन, सुभाष राठोड, आकाश सुर्यवंशी, पांडुरंग येवले, विश्वनाथ स्वामी, गणेश मारताळेकर, दिलीप माने, दिलीप गोरे शिवशंकर कोरे, प्रदिप लाभशेटवार, वस्तीगृह अधिक्षक राजू मरवाळीकर सह अन्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंच लन प्राध्यापक हेमंत बावणे यांनी केले तर आभार प्रदर्शन कवी शंकर राठोड यांनी केले आहे. तालुक्यातील मरवाळी तांडा येथील आश्रम शाळेत ७६वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

### मलकागुडा येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त शालेय साहित्याचे वाटप



**माहूर**-तालुक्यातील मलकागुडा येथे भारतीय प्रजासत्ताक दिना-निमित्य जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मलकागुडा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सिडामखेड या दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि.२६ जानेवारी रोजी तालुक्यातील मलकागुडा ग्रामपंचायत येथे भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.मलकागुडा गट ग्रामपंचायतच्यावतीने मलकागुडा व सिडामखेड येथील जि.प.प्रा. शाळेचे विद्यार्थीना निमंत्रित करण्यात आले होते. दोन्ही शाळेतील विध्यार्थ्यांच्या वतीने गायन, इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतून भाषण, चावडीवाचन, नाटक,गृहपाठ, इंग्रजी पाढे या शालेय अभ्यासक्रम, वक्तृत्व,अभिनय या विविध कलेचे प्रदर्शन इय्यता पहिली ते चौथीच्या चिमुकल्या विध्यार्थ्यांनी याप्रसंगी उत्कृष्टपणे सादर केले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना गावातील उच्चशिक्षित तरुण मृत्युंजय पडलवार यांनी दोन्ही शाळेच्या उपस्थित सर्व विध्यार्थ्यांना प्रजासत्ताकदिनाचे महत्त्व सांगत शालेय अभ्यासाबद्दल मार्गदर्शन केले.

## ग्रामपंचायत लिपिक पदाचा निकाल जाहीर करण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. २७ जानेवारी**



ईस्लापूर येथील ग्रामपंचायत कार्यालय येथील लिपिक पदाची जागा रिक्त असल्या कारणाने येथील ग्रामपंचायत कार्यालयाने दि. १३ जुलै२०२४ रोजीच्या दैनिक प्रजावानी या वृत्तपत्रात जाहीर प्रगट दिले.

त्याचप्रमाणे दिनांक २० जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत या परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची वेळ देण्यात आली होती नंतर सर्वांचे अर्ज तपासणी झाली व परीक्षेसाठी एकूण ४४ उमेदवार पात्र ठरले होते व सर्वांना हॉल तिकीट देण्यात आले व दिनांक ०८ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ०१ ते २ यावेळेत इस्लापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे पेपर देण्या करिता एकूण ४१ परीक्षा आर्थी उपस्थित होते व पेपर प्रक्रिया पूर्ण झाली व दि.१४ ऑगस्ट २०२४ रोजी उत्तर तालीका सुचना फलकावर जाहीर करण्यात आली नंतर दि.१५ ऑगस्ट २०२४ रोजी इस्लापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे सर्व परीक्षा आर्थी समोर पेपर तपासणी व निकाल प्रक्रिया पूर्ण झाली यावेळी सत्येश्वर पेशवे या विद्यार्थ्यांना ९०+२ एकुण ९२ गुण मिळाले समजले तेव्हा गोंधळ झाला असे शुल्लक कारण दाखवून परीक्षेचा निकाल ताटकळत ठेवला.

व नंतर सत्येश्वर पेशवे यांनी ग्रामपंचायत कार्यालय यांना वारंवार निकाल जाहीर करण्याकरिता पत्रव्यवहार केला या कार्यालयाकडून कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने सत्येश्वर पेशवे यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार करूनही त्यांना कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही म्हणून आज इस्लापूर येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसून लिपिक पदाचा निकाल देईपर्यंत उपोषण मागे घेणार नाही अशी माहिती उपोषण कर्त्यांनी दिली.

## स्व: पत्रकार गंगाधर सवई यांना आदराजंली

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २७ जानेवारी**

उमरी तालुक्यातील जेष्ट पुरोगामी फुले शाहू आंबेडकर चळवळीचे नेते तथा जेष्ट पत्रकार स्वः गंगाधर मानिकराव सवई यांना उमरी पत्रकार संघाकडून दि . २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजत शोकसभा घेवून विन्रम अभिवादन पर आदराजंली वाहण्यात आली आहे .



स्व गंगाधरराव सवई गेली ४० वर्ष आंबेडकर चळवळ तालुक्यात जिवंत ठेवली आहे अन्याय अत्याचार विरोद्धात संघर्ष करणारा हा योद्धा होता त्यांनी सामाजिक चळवळी सह इतर अठरा पगड समाजातील न्याय देण्याचे काम केले त्यांनी आंबेडकर चळवळ चालविताना स्वयम बरबाद झाले पण समाजासाठी मानुसकीचा ठेवा ठेवून गेले आहेत आज त्यांचे मुले त्रिरत्न सवई हा उदोगात तर दुसरा मुलगा ड .भिमराव सवई हा कायदयात तर तिसरा मुलगा प्रा . सुदिप हा शैक्षणीक क्षेत्रात माहेर आहेत अशा तिमुर्ती संपती कमावली आहे.

त्यांच्या या कार्यास आदराजंली म्हणून कार्यक्रमाचे नियोजन नगरसेवक तथा माजी बांधकाम सभापती ईश्वर आण्णा सवई , माजी उपनगराध्यक्ष अनिल सोनकांबळे , डि जी तुपसाखरे , सामाजीक विद्वते सुरेश हानमंते , यांनी केले आहे . या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ट पत्रकार पी जी गिलचे होते तर त्यांना आदरांजली वाहण्यासाठी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध प्रबोधनकार लॉडबुद्धा गायक भिमशाहिर बाबुराव गाढेकर पिंपळढवकर यांचा संच आपल्या गायणातून विनम्र श्रद्धांजली अर्पण केली आहे .

यावेळी माजी प्राचार्य ए एस जाधव सर , माजी नगरसेवक सुरेश सवई ,नगरपरिषद वरिष्ट कर्मचारी गणेश मदणे ,नगरसेवक प्र. सोनू वाघमारे , भिमशाहीर पत्रकार भिमराव वाघमारे , माजी नगरसेवक राजेश सवई, खा. पि.ए. दासा शिंदे, माहिती तालुकाध्यक्ष संदिप गोवंदे, जमादार श्रीराम सवई, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अरुण भद्रे, समाजभूषण किशनदादा कुदळेकर, बालाजी देवके, खंडेलोटे, पवार, वाघमारे कार्लेकर, मारोती वाघमारे , यासह पत्रकार बापूराव रिठ्ठेकर, प्रशांत जोधंळे ' कैलास सोनकोबळे , पांडूरंग सोनकांबळे, किशोर कवडीकर, प्रा. वंसत सवई, संपादक उध्दव मामडे, संपादक फराद बेग, प्रकाश कार्लेकर , आनंदा राठोड , बालाजी बंगारीकर , पत्रकार जाधव , साहेबराव तुरेराव आदी पत्रकार बांधवासह सामाजिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## राजेश्वर कांबळे जनहित दर्पण पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. २७ जानेवारी**

पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कंधारचे प्रख्यात पत्रकार राजेश्वर कांबळे यांना राज्यस्तरीय जनहित दर्पण पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नांदेड जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते राजेश्वर कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान, जवळा (दे) ता.लोहा जि.नांदेड यांचा राज्यस्तरीय जनहित पुरस्कार वितरण सोहळा सोमवारी, २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बाजार मैदान, सोनखेड ता.लोहा येथे तिसऱ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनात पार पडला.



यावेळी संमेलनाध्यक्ष तथा ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे सदस्य श्रीधर नांदेडकर, माजी जि.प.सदस्य कालिदास मोरे, राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष भैय्यासाहेब गोडबोले, सोनखेडचे सरपंच प्रतिनिधी रामदास इंगळे, सोनखेडचे उपसरपंच सुनील मोरे, जेष्ठ साहित्यिक देविदास फुलारी, पूर्व संमेलन अध्यक्ष प्रा.महेश मोरे, सेवानिवृत्त कॅप्टन संजय कदम, सेवानिवृत्त शिक्षक उत्तमराव मोरे, ग्रामपंचायत सदस्य सोपानराव मोरे, रामकिशन वड, माणिकराव मोरे, माऊली मोरे, दत्तात्रय फाजगे, आनंद गोडबोले आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात कंधारचे प्रख्यात पत्रकार राजेश्वर कांबळे यांना राज्यस्तरीय जनहित दर्पण पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नांदेड जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते राजेश्वर कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल आणि पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## किनवट माहूर रिक्त पोलीस ठाण्यातील अनुशेष तातडीने भरा; मुख्यमंत्र्यांना आ. केराम यांचे पत्र

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २७ जानेवारी**

किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यात कार्यरत असलेल्या दुर्गम, डोगंराळ भागातील पाच पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचाऱ्यांची जवळपास तीस ते चाळीस टक्के पदे ही रिक्त आहेत.अपुऱ्या संख्याबळामुळे कायदा व सुव्यव्यवस्था टिकऊन ठेवण्यासाठी कसरत होत असुन ही बाब लक्षात घेऊन आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन पोलीस कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्याची मागणी केली आहे.



लोकसंख्या व भौगोलिक दृष्टीने नांदेड जिल्ह्यातील सर्वात मोठे तालुके म्हणून किनवट माहूरची नोंद आहे. हा भाग आदिवासी डोंगराळ व मागास असल्यामुळे दोन्ही तालुक्यात ५ पोलीस ठाणे कार्यान्वित असून प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत ५० ते ६० गावांचा समावेश आहे.

परंतु गेल्या कित्येक दिवसापासून या पाचही पोलीस स्टेशनअंतर्गत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनेक पदे रिक्त आहेत. किनवट पोलीस ठाण्यात ९५ पदे मंजूर आहेत त्यापैकी केवळ ४९ पोलीस कार्यरत आहेत.इस्लापूर ठाण्यात ५९ मंजूर पदापैकी केवळ २६ कर्मचारी आहेत.मांडवी ठाण्यात ७० पदे मंजूर असताना प्रत्यक्षात २२ कर्मचारी आहेत. माहूर पोलीस ठाणेअंतर्गत ७० पदे मंजूर आहेत परंतु तेथे केवळ ३६ पोलीस कर्मचारी आहेत.सिंदखेड ठाण्यात ४५ पदाची मंजुरी असताना केवळ २३ कर्मचाऱ्यावर संपूर्ण भार आहे.या व्यतिरिक्त उ-४७ रायफलधारी ४५ पदे मंजूर आहेत परंतु १२ हजर आहेत. किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यातील बहुतांश लोकसंख्या जंगलव्यापी दऱ्याखोऱ्यात, वाडी तांड्यात वास्तव्य करून आहे. अशा भागातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने व जनतेच्या रक्षणासाठी अपुऱ्या कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.गुन्हेगारी,अवैध धंद्यावर अंकुश ठेवताना तसेच सण उत्सव काळात पोलिसावर बंदोबस्तचा प्रचंड ताण पडतो. रिक्त पदासंदर्भात जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांना अनेकदा तोंडी कळविले परंतु प्रतिसाद मिळाला नसल्याची बाब आ. भीमराव केराम यांनी पत्रात नमूद केली असून पाचही पोलीस ठाण्याअंतर्गत रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्यासाठी संबंधिताना तातडीचे आदेश द्यावेत अशी मागणी त्यांनी केली आहे.

## प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यार्थ्यांना फळे व शैक्षणिक साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २७ जानेवारी**

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष, माजी मंत्री मा.बबनराव घोलप, विदर्भ अध्यक्ष संबा वाघमारे, प्रदेश अध्यक्ष माधवराव गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड युवा तालुकाध्यक्ष सुभाष दुधंबे, सामाजिक कार्यकर्ते वैभव हाटकर, विकास उन्हाळे, चंद्रकांत वाघमारे, वरद हाटकर, आदि प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांनी राजर्षी शाहु प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व तसेच अंकुर शिक्षण संस्था संचलित निवासी मुकबधिर विद्यालय वसतिगृह, जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा मुदखेड येथे विद्यार्थ्यांना फळे, व शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी वरद हाटकर, बालाजी राठोड, विकी दुधंबे, उद्धव राठोड, बादल राठोड, हरिश कांबळे, आदींची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेतील सर्व कार्यालयात स्वच्छता मोहिम

**अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ जानेवारी**

२५- राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत स्वच्छता हा महत्त्वाचा विषय असून शुक्रवार दिनांक २४ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेच्या अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये व्यापक स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या हस्ते या मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावर यांची उपस्थिती होती.




या स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालये व परिसराची स्वच्छता केली. या मोहिमेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक संदेश गेला असून, स्वच्छता ही केवळ कर्मचाऱ्यांची नव्हे, तर सर्वांची जबाबदारी असल्याचा संदेश दिला गेला आहे.

सर्व कार्यालयात स्वच्छतेचा उपक्रम सातत्याने राबविणे ही आपली जबाबदारी आहे. अधिकारी व कर्मचारी यामध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास हा उपक्रम यशस्वी होईल, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी व्यक्त केले.

तालुका स्तरावरील सहभाग

राज्याचे मुख्यमंत्री महोदय यांच्या सात कलमी कार्यक्रमातील स्वच्छता उपक्रमाला जिल्ह्यातील तालुका स्तरावरही मोठा प्रतिसाद मिळाला. पंचायत समिती, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामपंचायत आदींमध्ये ही मोहिम राबवण्यात आली. गट विकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि अन्य कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या मोहिमेदरम्यान कार्यालयांमधील टेबल-खुर्च्यांची सफाई, कपाटांतील फाईल्सचे वर्गीकरण, तसेच परिसराची स्वच्छता करण्यात आली.

**तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात**
**इ.कि.फौ. अर्ज.क. १८१/२०२४**
**पिराजी शंकर शिंदे**
**विरुध्द**
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बोरजुनी ता.उमरी**
**प्रकरण : मृत्यू नोंद घेणे बाबत.**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे पिराजी शंकर शिंदे रा. बोरजुनी ता.उमरी जि.नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ अन्वये दि. १६/१२/२०२४ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि.फौ अर्ज १८१/२०२४ दाखल केला आहे.

अर्जदार यांचे वडील नामे शंकर नागोबा शिंदे यांचा मृत्यु दिनांक २९/०९/२००२ रोजी झाल्याची नोंद मौ. बोरजुनी ता. उमरी जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसांच्या आत सदर करावा, नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. १५ दिवसात आत आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**दिनांक-२४/१२/२०२४** **आदेशावरून तहसिलदार**
**स्थळ- उमरी** **उमरी**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जालना जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द - पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

स्वातंत्र्य हा आपला अधिकार तर प्रजासत्ताक हा आपला अलंकार आहे. जालना जिल्ह्यात भाईचारा व संविधानाला सन्मान देणारा वर्ग उदयास यावा अशी आशा व्यक्त करते. तसेच जालना जिल्ह्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रगतीकरीता तसेच जिल्ह्याच्या सर्वांगिण विकास-ासाठी राज्य शासन कटीबध्द राहिल, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसवंर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त जालना येथील पोलीस मुख्यालय मैदानावर श्रीमती मुंडे यांच्या हस्ते आज मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल आदींसह स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ ठरलेली भारतीय राज्यघटना राष्ट्राला अर्पण करण्यात आल्याने जगामध्ये भारत देश एक प्रजासत्ताक गणराज्य म्हणून उदयास आले. लोकशाही तंत्राने घटनेनुसार देशाचा कारभार सुरु झाला. नागरिकांना राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार मिळाल्याने या दिवसाला विशेष महत्व आहे. भारतीय घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये अमुल्य योगदान राहिले. त्यामुळेच जगात भारतीय लोकशाही श्रेष्ठ ठरली आहे.

आपला जालना जिल्हा विकासाभिमुख जिल्हा म्हणून ओळखला जातो. विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे विविध क्षेत्रात सतत अग्रेसर राहिला आहे, त्याचा मला जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून अतिशय आनंद आणि अभिमान आहे. राज्य शासनाने सर्वसामान्य जनतेसाठी काही महत्वकांक्षी योजना सुरु केल्या आहेत. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज पुरवठा योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना आणि मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना या योजनांचा समावेश आहे. स्टील व सीडस उद्योगामुळे आपला जिल्हा ओळखला जातो. यापुढे सिल्क अर्थात रेशीम शेती व त्यावरील प्रक्रिया उद्योगामुळे जिल्ह्याची नवीन ओळख निर्माण होत आहे. नवीन तुती लागवड करुन, जालना जिल्हा राज्यात प्रथम



क्रमांकावर आहे. जालना येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे टोमॅटीक रिलींग मशीनचीही उभारणी करण्यात आली असून, याद्वारे उत्कृष्ट दर्जाचे रेशीम सुताची निर्मिती करण्यात येत आहे. यामुळे अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. रेशीम सूत उत्प-ादनाची पुढील प्रक्रीया जसे हातमागावर कापड बनविण्याचे काम लवकरच जालना येथे सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बालविवाह रोखण्यासाठी मागील कालावधीत जिल्ह्यात चांगले काम झाले आहे. जिल्ह्यात मागील वर्षात १३७ बाल विवाह रोखण्यात महिला व बालविकास विभागाला यश आले आहे. क्रीडा विभागाच्यावतीने विकसीत करण्यात येत असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाच्या पहिल्या टप्प्यातील विकासकामाचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले असुन दुसऱ्या टप्प्यातील विकासकामे प्रगतीपथावर आहेत. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अत्याधुनिक सुविधा असलेले तालूका क्रीडा संकुल विकसीत करण्यात येत आहे. तसेच ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह योजनेतंर्गत जालना जिल्ह्यासाठी १२ नवीन वसतिगृहे मंजूर झाली असून , यापैकी ८ वसतिगृहे सुरु झाली आहेत. कायदा व सुव्यवस्था, सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी जिल्हा नियोजनच्या निधीतून जालना शहरात ९० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. यामुळे पोलिस विभागाला गुन्हेगारी रोखण्यास मदत होणार आहे. जालना महानगर पालिका क्षेत्रातील नगर भूमापन झालेल्या क्षेत्रातील मिळकत पत्रिकासंदर्भात जनतेच्या तक्रारी वाढत आहेत. अशा स्वरुपाच्या तक्रारीवर तात्काळ कार्यवाही करण्यासाठी तसेच यापुढे अशा तक्रारी प्राप्त होवू नये याकरीता जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांनी 'जालना महानगर पालिका क्षेत्रातील नगर भुमापन मिळकतींचे जी.आय.एस. आधारीत सर्व्हेक्षण' सुरु केले आहे. या कार्यक्रमास 'पवित्र' असे नाव देण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून नगर भूमापन क्षेत्रातील प्रत्येक मिळकतीस अक्षांस व रेखांश मिळणार आहेत. यामुळे भविष्यात मिळकतीच्या हद्दी संदर्भात वाद उत्पन्न होणार नाहीत, तसेच बिनशेती भुखंडाच्या मालकी हक्कांचे संरक्षण होणार आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांच्या हस्ते जालना जिल्ह्यातील गौरवास्पद कामगिरी केलेल्या अधिकारी, कर्मचारी, खेळाडू, गुणवंत मार्गदर्शक, गर्भलिंग निदान प्रतिबंधक समिती पथक यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, मान्यवर व नागरिकांची भेट घेत त्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रारंभी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण झाले. यानंतर पालकमंत्री यांनी पोलीस परेडचे निरीक्षण केले. यावेळी पोलीस, होमगार्ड, सैनिक शाळेचे विद्यार्थी, एन-सीसीच्या विद्यार्थ्यी यांची मानवंदना स्विकारली सलामी देण्यात आली. विविध विभागांनी चित्ररथाद्वारे योजनांचे सादरीकरण केले. शेवटी पोलिस विभागाने सायबर फ्रॉड जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. तसेच शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर सुंदर नृत्याचे सादरीकरण केले.

## संक्षिप्त

### मराठा आंदोलक मनोज दादा जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलक मा.श्री.मनोज दादा जरांगे पाटील हे १०४ मराठा बांधवांसमवेत मराठा समाजाला आरक्षण व तद्रुंषगिक मागण्यांची पुर्तता होण्यासाठी मौजे अंतरवाला सराटी, ता.अंबड, जि.जालना येथे शनिवार, दिनांक २५.०१.२०२५ पासुन आमरण उपोषणाला बसलेले आहेत. मा.श्री.मनोज दादा जरांगे पाटील यांची प्रकृती खालावलेली आहे. मराठा समाजाच्या भावना तीव्र असुन, असंतोष निर्माण झालेला आहे.

मा.श्री.मनोज दादा जरांगे पाटील व १०४ मराठा बांधव यांच्या खालावत चाललेल्या प्रकृतीची दखल घेऊन सदरहू उपोषण तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्यांत यावी अशी विनंती करणारे निवेदन खा.डॉ.कल्याण काळे साहेब यांनी आज दिले.

### प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रासाठी अर्ज करावेत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जालना तालुक्यातील सेवली, देवमुर्ती आणि मंठा तालुक्यातील तळणी तसेच भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथे कौशल्य विकास केंद्र स्थापन करावयाची आहेत. तरी जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण भागीदार नियुक्त करण्यासाठी संस्थांनी जालना येथील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात दि.१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी केले आहे.

### संतराम आखाडे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते,सामाजिक कार्यकर्ते पत्रकार संतराम आखाडे यांचे मंगळवारी (दि. २८) सकाळी निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते. मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्यावर प्रारंभी जालना व त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार करण्यात येत होते. मात्र मंगळवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम स्मशाभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी समाजातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई,पत्नी, दोन मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अर्जुन पाडेवार यांचे ते मामा होते.

## कुंभमेळ्यावरून परतणाऱ्या भाविकांच्या गाडीला अपघात; एक ठार तर तिघे जखमी



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

प्रयागराज येथील कुंभमेळ्यावरून परतत असताना परतुर अवघे वीस अंतरावर राहिलेले असताना अपघात झाला यात एक जण जागेवरच ठार झाला तर इतर तीन जखमी झाले या दुर्दैवी घटनेने परतूर शहर व परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की येथील मोठा मित्र परिवार असलेले यशवंत रोहिनकर (४२)यांचे मंठा-तळणी रोडवर तळणी फाटयाजवळ कार अपघातात निधन झाले.

सध्या प्रयागराज येथे कुंभमेळा सुरु असुन मित्रासोबत ते प्रयागराज येथे गेले होते काल २८ जानेवारी रोजी परतीच्या प्रवासात असताना पहाटे ५.०० वा.मंठा-तळणी रोडवर जिनिंगसमोर कापसाने भरलेल्या अँपेला स्विफ्ट गाडी धडकली यात यशवंत (बाळु)रोहिनकर यांचा जागीच मृत्यू झाला तर त्याचे सहकारी योगेश वायाळ, सुरेश(गुड्डु)राऊत व आकाश काळे जखमी झाले. जखमीला तातडीने जालना येथे उपचारासाठी पाठवण्यात आले.अतिशय प्रेमळ,मितभाषी,संकटकाळी मित्राच्या मदतीला धावुन येणारा,मोठा मित्रपरिवार असलेल्या यशवंत रोहिनकर यांच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे त्यांच्या पश्चात लहान भाऊ,पत्नी व दोन मुली आहेत.

घटना समजताच मंठा येथील सामाजिक कार्यकर्ते राजेश मोरे व नगरसेवक प्रदीप भाऊ बोराडे यांनी घटनास्थळावर जावुन रुग्णांना व जखमीला मदत केली.

## जनतेच्या हितासाठी एसटी दरवाढ मागे घ्यावी -तालुकाध्यक्ष संदीप कंटुले



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

एसटीची सेवा ही ग्रामीण व शहरी जनतेसाठी जीवन रेखा असून राज्यातील सर्वसामान्य प्रवाशांची जीवन वाहिनी म्हटल्या जाणाऱ्या एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग व राज्य सरकारने दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला असून तो सर्वसामान्य प्रवाशांच्या दृष्टीने हितकारक नाही राज्य परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत एसटीच्या भाडेवाडीला मंजुरी देण्यात आली असून सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशात मोठा भार पडणार आहे तसेच या भाडेवाडीमुळे गरीब व मध्यमवर्गीयावर आर्थिक बोजा पडणार आहे एसटी महामंडळाने शनिवार मध्यरात्रीपासून १५ टक्के भाडेवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे खेडोपाड्यातील सर्वसामान्य जनतेचा प्रवास महागला आहे. एसटीची भाडेवाढ करताना ती पाचच्या पटीत असायला हवी होती. परंतूही भाडेवाढ विषम प्रमाणात झाल्याने आता ग्रामीण भागातील जनतेला तिकीट काढताना सुट्टे पैसे देताना अडचण होत आहे. नवीन भाडेवाढ करताना ती सम प्रमाणात न झाल्याने सुट्टे पैसे जर प्रवाशांकडे नसतील तर कंडक्टर आणि प्रवाशांत वाद उद्भवनार असून ही भाडे वाढ एसटी प्रवासी आणि कंडक्टर यांच्यात वाद करणारी ठरणार आहे त्यामुळे सरकारने गोरगरीब जनतेसाठी सदरची भाडे वाढ रद्द करण्यात येऊन घेतलेला निर्णय मागे घेण्यात यावा असे घनसावंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुका अध्यक्ष संदीप भैया कंटुले यांच्या नेतृत्वाखाली घनसांगी बस स्टँड समोर रास्ता रोको करण्यात आले यावेळी शिवसेना नेते शंतनू भैया देशमुख युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश काळे विभाग प्रमुख बबनरावजी घो-गरे बाळासाहेब गावडे यादवराव देशमुख गोपाल तांगडे दिलीप कंटुले राजेंद्र तांगडे ज्ञानेश्वर आर्दड, प्रल्हाद नाईकवण, अर्जुन पवार हे उपस्थित होते यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## अंमलदार प्रशांत लोखंडे यांचा गौरव!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथील जालना गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार प्रशांत शिवाजी लोखंडे यांनी दिलेल्या उलेखनीय योगदानाबद्दल प्रजास्ताकदिनी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रशांत शिवाजी लोखंडे यांनी जालना स्थानिक गुन्हे शाखेत असताना जिल्ह्यातील गर्भलिंग निदान व अवैध गर्भपात संदर्भात केलेले काम उलेखनीय व प्रेरणादायी असल्याबद्दल पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी मठा परतूर च आमदार



बबनराव लोणीकर, बदनापूर चे आमदार नारायण कुचे, भोकरदन चे आमदार संतोष पाटील दानवे उपस्थित होते.या यशाबद्दल पारध येथील गावकऱ्यांच्या वतीने व सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## स्व.ॲड.भाऊसाहेब देशमुख महाविद्यालयातील चार विद्यार्थी राज्यस्तरीय युवा प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यासाठी रवाना

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन येथील जनविकास शिक्षण संस्था संचलित स्व ड भाऊसाहेब देशमुख कला,विज्ञान व वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय जोमाळा,भोकरदन चे विद्यार्थी योगेश मोठेबा बरडे, देविदास हिमंतराव उबाळे, सुनिल गजानन पाचरणे, ऋषिकेश विठ्ठल गोरे हे सेवाग्राम वर्धा येथे राष्ट्रीय युवा संघटन द्वारे आयोजित १९ व्या राज्यस्तरीय युवा प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यासाठी निघाले असता महाविद्यालयाच्या वतीने त्यांना प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यासाठी निरोप देण्यात आला.



यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वास तळेकर, काकासाहेब ढवळे, उपप्राचार्य एच व्ही नागरगोजे,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी सोपान सपकाळ, जनसंपर्क अधिकारी रोषण देशमुख, प्रा.गुणरत्न मगरे,नितीन दळवी इत्यादीची उप-स्थिती होती.

## वृक्षारोपण व वृक्ष संगोपनाचा संकल्प घेऊन आईच्या स्मृती वृक्षाच्या रूपात कायम जिवंत ठेवण्यासाठी प्रथम स्मृतिदिनी दिली अनोखी श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मानवी जीवनासाठी अनिवार्य असलेल्या प्राणवायूची गरज भागविणाऱ्या व संपूर्ण सजीव सृष्टीवर प्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या वृक्षांची संख्या विभिन्न कारणामुळे कमी होत चालली आहे. सामाजिक संस्था - संघटना व शासन स्तरावरून सातत्याने प्रयत्न होऊन सुद्धा वृक्ष संवर्धनाविषयी समाजामध्ये पाहिजे तशी जनजागृती झालेली दिसून येत नाही.

महाराष्ट्रामध्ये गाव खेड्यांचे मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत असताना सोबतच कष्ट करून जगणारी, ग्राम संस्कृती व पर्यावरणाची जिवापाड काळजी घेणारी, गावातली शेवटची पिढी पडद्याआड जात असताना त्यांच्या स्मृतींना सकारात्मक/पर्यावरण पूरक कृतीतून जिवंत ठेवण्याचा अनोखा प्रयत्न दिवंगत आईच्या प्रथम स्मृतीनिमित्त सामनगावातील कावळे परिवाराने' वृक्ष संवर्धन व संगोपन




संकल्प कार्यक्रमातून' राबविला आहे.

गतवर्षी जानेवारी २०२४ मध्ये सामनगाव येथील रहिवाशी स्वर्गीय गंगुबाई नानाभाऊ कावळे यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. संपूर्ण आयुष्यभर अत्यंत कष्ट करत त्यांनी शेती, माती व नात्यावर जीवापाड प्रेम करून मुलांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. शुद्ध अध्यात्मिक वृत्ती व पर्यावरणाची आवड असल्यामुळे वृद्धापकाळपर्यंत त्यांनी दारातील तुळस आणि उंबरांचे झाड यांची स्वतःच्या प्रकृती पेक्षाही अधिक काळजी घेऊन जगाचा निरोप घेतला. 'मरावे परि,वृक्ष रुपी उरावे' या उक्ती प्रमाणे आईच्या आठवणी कायम ठेवण्यासाठी व समाजाला निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने प्रथम स्मृतीदिन निमित्त होणारा खर्च वृक्ष लागवड व त्याची जोपासना करण्यासाठी केला गेला. यावेळी गावातली नियोजित स्मशान भूमीच्या परिसरात पवित्र व पर्यावरणपूरक समजल्या जाणाऱ्या प्रामुख्याने वड, उंबर , निम , जांभूळ,बेल या सोबतच इतर देशी झाडांची लागवड केली गेली. संपूर्ण वृक्षांना प्राण्यापासून संरक्षणासाठी संरक्षक जाळ्या लावण्यात आल्या. तसेच सर्व झाडांची भविष्यात योग्य पद्धतीने आणि नियोजनपूर्वक जोपासना करण्याचा संकल्प केला गेला. आईच्या स्मृतिपित्यर्थ प्रा.डॉ. बी. एन. कावळे यांच्या संकल्पनेतून रबिलेल्या वृक्षार-ोपण व संगोपन संकल्प उपक्रमाचे कुटुंबातील सर्व सदस्य, आप्तेष्ट व ग्रामस्थांनी स्वागत केले.

याप्रसंगी सरपंच प्रल्हाद नेमाने, उपसरपंच लंकेश्वर चीरखे, योगेश चिरखे,शिवाजी कावळे, रवींद्र कावळे, गजानन, कावळे ,राधाकिशन कावळे ,गणेश कावळे, दशरथ कावळे,रमेश परांडे , शेषराव दौड,विजय धांडे, विष्णू चव्हाण, रतनराव धांडे, पवन पडूळ, मुळे दाजी,जगन्नाथ चिरखे, गंगाराम चीरखे, योगेश चिरखे, बाळू कावळे, सुदर्शन कावळे , मधुकर ढेरे, रवि चिरखे,बळीराम कावळे, कल्पक कावळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

अवडंबर विरहित धार्मिक वृत्ती जोप-ासणाऱ्या आमच्या आईने आयुष्यभर श्रमाला 'पांडुरंग 'आणि येथील शेती व मातीला 'पंढरी 'समजून आपार कष्ट केले. समाज आणि निसर्गाकडून जे मिळाले ते परत करण्याचे आईचे संस्कार काही अंशी पुढे नेण्यासाठी प्रथम स्मृतिप्रीत्यर्थ स्व खर्चाने वृक्ष रोपण करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आला. आईच्या स्मृती वृक्षाच्या रूपात कायम जीवंत ठेवण्यासाठीची हि छोटीशी सुरुवात असल्याचे त्यांचे चिरंजीव प्रा. डॉ. बी एन कावळे यांनी सांगितले.

आईच्या प्रथम स्मृती दिन पित्यर्थ कावळे कुटुंबीयांनी वृक्षारोपण व वृक्ष संगोपन संकल्प हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम घेऊन समाज व पर्यावरणासाठी स्तुत्य व अनुकरणीय कार्य हाती घेतले आहे.यातून सर्वांना निसर्ग संवर्धनाची प्रेरणा मिळेल.या कार्यास ग्रामपंचायतीचे संपुर्ण सहकार्य राहिल. वृक्ष संगोपनासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू असे सामनगावचे सरपंच प्रल्हाद नेमाने यांनी यांनी सांगितले.